१०४ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• मुंबई, शनिवार २५ एप्रिल, २०२६ • वर्ष-१०४, अंक-५१, पाने-८, किंमत: ₹ ७

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 51 Marathi - Daily - Mumbai, 25 April, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे 24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

मंत्र्यांना अडवणं पडणार महागात?

navakal.in

@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

# आप पक्षात ऑपरेशन लोटस! केजरीवालना धक्का

## भाजपाने राज्यसभेचे १० पैकी ७ खासदार फोडले

**आम आदमी पक्षाचे (आप) अरविंद केजरीवाल यांना आज जबर धक्का बसला. आपचे राज्यसभेतील दहा खासदारांपैकी ७ खासदार भाजपाने फोडले. आता आपच्या संस्थापक सदस्यांपैकी फक्त संजय सिंह आणि आतिषी हे दोघे केजरीवाल यांच्यासोबत राहिले आहेत. आपच्या गुन्ह्यांत आम्ही सहभागी राहू शकत नाही, अशी गंभीर टीका करीत आज खासदारांनी आपला रामराम ठोकत भाजपात प्रवेश करणार असल्याचे जाहीर केले.**



■ नवी दिल्ली

**सध्या** सामान्यांचे विविध प्रश्न मांडल्याने लोकप्रिय झालेले आपचे खासदार राघव चड्ढा, संदीप पाठक आणि अशोक मित्तल यांनी आज 'आप'ला सोडचिठ्ठी देत भाजपात प्रवेश करत असल्याची घोषणा केली. एवढेच नव्हे तर आपचे दोन तृतियांश खासदार भारताच्या संविधानातील तरतुदींचा वापर करून भाजपामध्ये विलीन होणार आहेत, अशी माहिती देत आपचे ७ खासदार भाजपात प्रवेश करणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या घोषणेने खळबळ माजली असून, महाराष्ट्रातील शिवसेना आणि राष्ट्रवादीत उभी फूट पडल्यानंतर आता भाजपाने 'आप'ला संपवण्याची खेळी खेळली आहे. आपने या पक्षफोडीचे सारे खापर केंद्रिय गृहमंत्री अमित शहा यांच्यावर फोडले आहे. 'आप'ला एवढे मोठे खिंडार पडल्यावर आप पक्ष टिकवणे केजरीवाल यांच्यासमोर मोठे आव्हान असणार आहे. जे खासदार फुटले ते सर्व पंजाबचे आहेत. पुढील वर्षी पंजाब विधानसभा निवडणूक असल्याने ही कारस्थाने सुरू झाली आहेत. विशेष म्हणजे संजय मित्तल यांच्यावर काही दिवसांपूर्वीच ईडीने छापा टाकला होता. महाराष्ट्रातही शिंदे सेना किंवा उबाठा कोणत्याही क्षणी फोडली जाईल अशी कुजबुज आहे. मात्र महाराष्ट्रात आता निवडणुका नसल्याने तूर्त ही फोडाफोडी थांबली आहे.

आपने २ एप्रिल रोजी राज्यसभा खासदारांच्या उपनेतेपदावरून राघव चड्ढाला हटवले होते. राज्यसभा सचिवालयाला पत्र लिहून राघव यांना पक्षाच्या कोट्यातून बोलण्यासाठी वेळ देऊ नये असेही कळवले होते. त्यामुळे आप आणि राघव यांच्यात दुरावा वाढला होता. आज त्यांच्याबरोबर सदीप पाठक आणि अशोक मित्तल हेही भाजपात गेले. विशेष म्हणजे, आपने राघव यांच्या जागी उपनेतेपदी म्हणून निवड केली, 'लव्हली युनिव्हर्सिटी'चे कुलगुरू ते अशोक मित्तल हेही राघव चड्ढा यांच्यासोबत भाजपात गेले आहेत. उपनेते होताच त्यांच्यावर ईडीच्या धाडी टाकण्यात आल्या होत्या. याशिवाय क्रिकेटपटू हरभजनसिंह, विक्रमजीत साहनी, राजेंद्र गुप्ता आणि स्वाती मालिवाल हेही आप सोडून भाजपात जाणार असल्याचे राघव चड्ढा यांनी आज जाहीर केली.

राघव चड्ढा यांनी आज पत्रकार परिषद घेतली तेव्हा संदीप पाठक आणि अशोक मित्तल उपस्थित होते. या पत्रकार परिषदेत राघव चड्ढा म्हणाले की, आम्ही म्हणजेच राज्यसभेतील 'आप'चे दोन-तृतीयांश सदस्यांनी भारताच्या संविधानातील तरतुदींचा वापर करून भाजपामध्ये जाण्याचा निर्णय घेतला आहे. ज्या 'आप'ला मी माझ्या रक्ताने आणि घामाने वाढवले आणि माझ्या तारुण्याची १५ वर्षे समर्पित केली, तो पक्ष आता आपली मूळ तत्त्वे, मूल्ये आणि नैतिकतेपासून भरकटला आहे. हा पक्ष आता देशाच्या हितासाठी नव्हे, तर वैयक्तिक फायद्यासाठी काम करतो. गेल्या काही वर्षांपासून मला जाणवत होते की, मी चुकीच्या पक्षात योग्य व्यक्ती आहे. त्यामुळे, आज मी जाहीर करतो की, मी 'आप'पासून वेगळा होत आहे आणि जनतेच्या जवळ जात आहे.

राघव चड्ढा पुढे म्हणाले की, मी पक्षात येण्यापूर्वी चार्टर्ड अकाउंटंट होतो. त्यावेळी माझ्यासोबत विविध क्षेत्रांतील लोक आपमध्ये सामील झाले होते. या सर्व लोकांनी भ्रष्टाचारमुक्त भारत घडवण्याच्या निर्धाराने, आपले सर्वस्व अर्पण करून या पक्षाची स्थापना केली होती. आपले सर्व काही सोडून ते हा भ्रष्टाचारमुक्त पक्ष स्थापन करण्यासाठी आले होते. मी या पक्षाचा संस्थापक सदस्य होतो. त्यामुळे या पक्षाबाबत माझ्यापेक्षा चांगले कोणालाच माहीत नसेल. आम्ही सर्वांनी मिळून, पूर्ण वचनबद्धतेने आणि निष्ठेने दिल्लीत हा पक्ष स्थापन केला आणि इतर राज्यांमध्ये त्याचा विस्तार करण्याचा प्रयत्न केला. पण आज, अत्यंत दुःख आणि शरमेने मला हे सांगावे लागत आहे की, भ्रष्टाचार संपवण्याच्या शपथेने स्थापन झालेला हा पक्ष आता भ्रष्ट आणि तडजोड करणाऱ्या लोकांच्या हातात गेला आहे. म्हणूनच आज अनेकांनी पक्ष

» पान ७ वर

# निवडणूक आयोग आयुक्तांना पदमुक्त करण्यासाठी पुन्हा नोटीस

**राज्यसभेतील ७३ विरोधी पक्ष खासदारांनी नऊ कारणे देत निवडणूक आयोगाचे आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदमुक्त करण्याची नोटीस राज्यसभा सचिवालयाला दिली. ही दुसरी नोटीस आहे. तृणमूल काँग्रेसच्या नेतृत्त्वात पहिल्यांदा दिलेली नोटीस लोकसभा अध्यक्ष आणि राज्यसभा सभापतींनी फेटाळून लावली होती.**



■ नवी दिल्ली

**मुख्य** निवडणूक आयुक्तांना हटविण्यासाठी लोकसभा आणि राज्यसभेत विशेष बहुमत आवश्यक आहे. आज सादर झालेल्या नोटीसवर आप पक्षाच्या खासदारांच्याही सह्या आहेत. या नोटीसबाबत माहिती देण्यासाठी घेतलेल्या पत्रकार परिषदेत काँग्रेसचे प्रवक्ते जयराम रमेश यांनी म्हटले की, आयुक्तांवर नऊ गंभीर आरोप आहेत, त्यांची वर्तणूक व निर्णय हे घटना विरोधी आहेत. हे आरोप नाकारता येणार नाहीत.

पश्चिम बंगालमध्ये निवडणुकीच्या तोंडाशी राबवलेली मतदार पडताळणी मोहीम आणि या एसआयआर प्रक्रियेबाबत प्रचंड गोंधळाच्या तक्रारी झाल्या. निवडणुकीच्या तारखा जाहीर करताना भाजपावर विशेष मेहरबानी केली. पंतप्रधान मोदी यांचे प्रचाराचे भाषण होईपर्यंत थांबून निवडणूक घोषणेची पत्रकार परिषद घेण्यात आली, कोणत्या राज्यात किती टप्प्यात मतदान घ्यायचे हा निर्णयही भाजपाला फायदेशीर ठरेल या दृष्टीने घेण्यात आला. प्रचाराच्या

» पान ७ वर

# भाजपा मोर्चात मंत्री महाजनांना सुनावणाऱ्या महिलेविरूध्द तक्रार

■ मुंबई

**भाजपाने** आयोजित केलेल्या या मोर्चाचे नेतृत्व मंत्री गिरीश महाजन यांनी केले होते. मोर्चावेळी वाहतूक कोंडीत अडकलेल्या एका महिलेचा संताप अनावर झाला. तिने मोर्चेकरांना तसेच मंत्री गिरीश महाजन यांना जाब विचारत वाहतूक सुरळीत करण्याची मागणी केली. या घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाला. यानंतर सोशल मीडियावर या महिलेला अनेकांनी पाठिंबा देत तिचे वर्तन योग्य असल्याचे म्हटले होते.

या महिलेविरोधात झेन सदावर्ते हिने वरळी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीत संबंधित महिलेने पोलीस बंदोबस्तावर असलेल्या अधिकाऱ्यांशी गैरवर्तन व शिवीगाळ केल्याचा आरोप करण्यात आला आहे. झेन सदावर्ते हिने सांगितले की, ही महिला आपल्या कारमधून उतरून मोर्चात व्यत्यय आणत होती आणि मोर्चेकऱ्यांशी असभ्य भाषेत बोलत होती. 'शट अप, डोन्ट टॉक टू मी, गेट आऊट' अशा अपमानजनक शब्दांचा वापर करत होती. तिच्या विरोधात वरळी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करून पोलिसांनी तिच्यावर कारवाई करावी, अशी विनंती केली आहे.




# विल्सन जिमखान्यानंतर आणखी वसतिगृह जैन संस्थेला देण्याचा घाट

■ मुंबई

**मरीन** ड्राईव्ह येथील विल्सन जिमखान्यानंतर मुंबईतील आणखी एक वसतिगृह जैन इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन (जिओ) या संस्थेला देण्याचा घाट मुंबई पालिकेने घातल्याची माहिती उघड झाली आहे.

कांदिवलीतील आकुर्ली परिसरातील १७ हजार ६७९.६०० चौरस फूट भूखंडावरील ५ मजली इमारतीतील वसतिगृहाच्या व्यवस्थापनाशी संबंधित प्रस्ताव पालिकेच्या सुधार समितीच्या बैठकीत मांडण्यात आला. हे वसतिगृह १८ वर्षांवरील विद्यार्थिनींसाठी बांधण्यात आले. याचे व्यवस्थापन आणि संचालन जैन इंटरनॅशनल ऑर्गनायझेशनकडे सोपवण्यात यावे, असा हा प्रस्ताव आहे. पालिकेकडून या जागेसाठी दरमहा प्रति चौरस फूट फक्त ५ रुपये असा दर आकारला.असून, त्यानुसार ८८ हजार ४०० रुपये मासिक भाडे जैन इंटरनॅशनल ऑर्गनायझेशनकडून वसूल केले जाणार आहे. याआधी मरीन ड्राइव्ह येथील विल्सन जिमखानाही या ऑर्गनायझेशनला देण्याच्या निर्णयावरून वाद निर्माण झाला होता.

# 'मेटा' ८ हजार कर्मचाऱ्यांना काढणार

## एआयचा फटका! ६,०००ची भरतीही रद्द



■ वॉशिंग्टन

**फेसबुक,** इंस्टाग्राम आणि व्हॉट्सॲपची मूळ कंपनी मेटामध्ये मोठ्या प्रमाणावर नोकरकपात होणार आहे. कंपनी आपल्या सुमारे १० टक्के कर्मचाऱ्यांना कामावरून कमी करण्याच्या तयारीत आहे. यामुळे जवळपास ८ हजार कर्मचाऱ्यांवर परिणाम होणार आहे. याशिवाय ६,००० रिक्त पदांची भरती रद्द केली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) क्षेत्रात मोठी गुंतवणूक आणि कंपनीचे कामकाज अधिक कार्यक्षम करण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेतल्याचे सांगितले जात आहे.

मेटा २० मे रोजी कपात केलेल्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या अधिकृत आणि वैयक्तिक ईमेलवर याबाबत सूचना पाठवणार आहे. कंपनी अधिकारी जॅनेल गेल यांनी कर्मचाऱ्यांना पाठवलेल्या अंतर्गत मेमोमध्ये याची माहिती दिली. या वर्षाच्या सुरुवातीला मेटामध्ये सुमारे ७९ हजार कर्मचारी कार्यरत होते. त्यापैकी १० टक्के म्हणजे अंदाजे ८ हजार कर्मचाऱ्यांची कपात होणार आहे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

मेटाचे सीईओ मार्क झुकेरबर्ग एआय क्षेत्रात शेकडो अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करत आहेत. भविष्यात कंपनीच्या अंतर्गत कामकाजात एआयचा मोठ्या प्रमाणावर वापर करण्याची योजना आहे. त्यासाठी खर्च नियंत्रण आणि संसाधनांचे पुनर्वाटप करण्याचा भाग म्हणून ही नोकरकपात होत असल्याची माहिती आहे. ज्या कर्मचाऱ्यांची

» पान ७ वर

# शिवसेना पक्ष व चिन्ह आता बुधवारी सुनावणी

■ नवी दिल्ली

**शिवसेना** पक्ष आणि 'धनुष्यबाण' निवडणूक चिन्हासंदर्भातील प्रकरणाची सुनावणी पुन्हा एकदा लांबणीवर पडली असून, ही सुनावणी आता बुधवारी २९ एप्रिल रोजी होणार आहे.

शिवसेनेचे हे प्रकरण काल न्यायालयाच्या कार्यतालिकेत समाविष्ट होते. मात्र, सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या नेतृत्वाखालील नऊ सदस्यीय घटनापीठ शबरीमाला मंदिरासह इतर धार्मिक स्थळांवरील महिलांविरोधातील भेदभावासंदर्भातील याचिकांवर सुनावणी करत असल्यामुळे संबंधित त्रिसदस्यीय घटनापीठ बसू शकले नाही. परिणामी, शिवसेना पक्ष आणि 'धनुष्यबाण' चिन्ह प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात आली असून, या प्रकरणाला पुन्हा एकदा नवी तारीख देण्यात आली आहे.

शिवसेना पक्ष आणि निवडणूक चिन्हासंदर्भातील हा वाद मागील तीन वर्षांपासून प्रलंबित आहे. सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी नोव्हेंबरमध्येच हे प्रकरण अंतिमतः निकाली काढण्याचे संकेत देत सुनावणीचे वेळापत्रक जाहीर केले होते. त्यामुळे या प्रकरणाच्या निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# रिक्षा चालकांच्या संपावरून मनसे आक्रमक

## संजय निरुपम - मनसैनिक आमनेसामने

■ ठाणे

**राज्यात** ऑटो आणि टॅक्सीचालकांना मराठी सक्तीचा नियम १ मेपासून लागू करण्यात येणार आहे. या विरोधात मुंबईतील रिक्षा संघटनांनी संपाची हाक दिली आहे. मनसेचे नेते अविनाश जाधव यांनी रिक्षाचालकांच्या या संपाविरोधात आक्रमक पवित्रा घेतला असून, रिक्षाचालकांनी संप केल्यास रस्त्यावर उतरण्याचा इशारा दिला आहे. मात्र शिंदे सेनेचेच दुसरे नेते संजय निरुपम यांनी १ मे रोजी मराठी सक्ती होऊ देणार नाही, अशी भूमिका घेतली. त्यावरून दहिसरमध्ये मनसैनिक आणि शिंदे सेनेचे कार्यकर्ते आमनेसामने आले.



दहिसरमध्ये संजय निरुपम रिक्षा चालकांना भेटायला गेले असता मनसैनिकांनी त्यांच्या गाडीच्या चाकाची हवा काढली. मनसैनिकांनी काही प्रमाणात दगडफेक केली. दोन्ही बाजूने जोदार घोषणाबाजी झाली. संजय निरुपम म्हणाले की, सध्या ज्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत चर्चा सुरू आहे तो २०१९ मधील जीआर आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की ऑटो किंवा टॅक्सी चालवणाऱ्या चालकांनी प्रवाशांशी मराठीत संवाद साधावा आणि जर मराठी येत नसेल तर ती शिकावी. असा आग्रह ठेवणे चुकीचे नाही. मात्र, आता म्हटले जात आहे की सर्व ऑटो आणि

» पान ७ वर

# राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचा चौथ्या दिवशी संप स्थगित

■ मुंबई

**सुधारित** निवृत्ती वेतन योजना आणि रिक्त पदांची भरतीसह दोन वर्षांपासून प्रलंबित असलेल्या १८ मागण्यांसाठी सरकारी-निमसरकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समितीने पुकारलेला बेमुदत संप आज चौथ्या दिवशी स्थगित घेण्यात आला. मुख्य सचिवांसोबत झालेल्या बैठकीत सुधारित निवृत्ती योजनेसंदर्भात १५ दिवसांत अधिसूचना काढली जाईल, निवृत्तीचे वय ६० करण्याबाबत निर्णय घेण्याचे आश्वासन आणि अन्य मागण्यांबाबत सकारात्मक प्रतिसाद मिळाला. त्यामुळे हा संप मागे घेण्यात आल्याचे सरकारी निमसरकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समितीने जाहीर केला. सरकारी कर्मचारी आणि शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी २१ एप्रिलपासून बेमुदत संप पुकारला होता. या संपामुळे राज्यातील महसूल विभागाच्या कार्यालयावर सर्वाधिक परिणाम झाला. मुद्रांक नोंदणीसह जमीन आणि घर खरेदी व्यवहार, विवाह नोंदणीचेही काम ठप्प झाले होते. अखेर आज चौथ्या दिवशी या संपावर तोडगा काढण्यात राज्य सरकारला यश आले असून, राज्य सरकारी कर्मचारी, शिक्षकांचे बेमुदत संप स्थगित झाले. तर शासकीय कार्यालयात सोमवारपासून नियमित कामकाज सुरू होईल.

# कोलकात्यातील हुगळी नदीत पंतप्रधान मोदींचा नौकाविहार

**निवडणूक प्रचारासाठी पश्चिम बंगाल दौऱ्यावर असलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज कोलकात्यातील हुगळी नदीमधील नौकाविहाराचा अनुभव घेतला. हुगळी नदीच्या काठावरील निसर्गसौंदर्याचा आनंद घेत त्यांनी बोटीतून विद्यासागर सेतू आणि हावडा ब्रिज यांची पाहणी केली. पश्चिम बंगालच्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या दौऱ्याला विशेष महत्त्व दिले जात आहे.**

■ कोलकाता



या दरम्यान पंतप्रधानांनी स्वतः कॅमेरा हातात घेऊन परिसरातील सुंदर दृश्य टिपली. त्यांनी स्थानिक नावाडी आणि सकाळी फिरायला आलेल्या नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. गंगा नदी ही बंगाली संस्कृतीचा अविभाज्य भाग असल्याचे सांगत त्यांनी या नदीशी असलेले भावनिक नाते व्यक्त केले.

हुगळी घाटावर नौकाविहार केल्यानंतर पंतप्रधानांनी एका नावाड्याला मिठी मारली. गौरांगो बिस्वास असे त्या नावाड्याचे नाव असून, त्यांनी सांगितले की, पंतप्रधान माझ्या नौकेत बसतील असे मला स्वप्नातही वाटले नव्हते. त्यांना पाहून मी थक्क झालो. त्यांच्या सांगण्यानुसार मी नाव गंगेच्या मध्यभागी नेली. बोटीतून उतरल्यानंतर मोदींनी त्यांना मिठी मारत बोटीचे भाडे म्हणून एक हजार रुपये दिले.

# टीसीएस प्रकरणात सरकारी वकील बदलण्याची मागणी

■ नाशिक

**नाशिकमधील** टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) लैंगिक छळ आणि धर्मांतर प्रकरणात सरकारी वकील म्हणून अजय मिसर यांची नियुक्ती करण्यासाठी नाशिक पोलीस आयुक्तांनी राज्य सरकारला पत्र पाठवले. यासंदर्भात अधिकृत प्रस्तावही सरकारकडे सादर करण्यात आला.

सध्या या प्रकरणात सरकारी वकील म्हणून किरण बेंडभर काम पाहत आहेत. पण गुंतागुंतीच्या आणि संवेदनशील स्वरूपाच्या या प्रकरणात अनुभवी वकिलाची गरज लक्षात घेता अजय मिसर यांच्या नियुक्तीचा प्रस्ताव पाठवण्यात आला आहे. मिसर यांनी यापूर्वी अनेक महत्त्वाचे खटले यशस्वीरित्या हाताळले असल्याने त्यांच्या नियुक्तीकडे लक्ष लागले आहे.



**मा. गृहमंत्री तथा मुख्यमंत्री,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

**विषय: आक्षेपार्ह, अश्लील व जीवे मारण्याची धमकी देणारे आ. संजय गायकवाड यांच्यावर गुन्हा नोंदवून अटक करणे व आमदारकीचा राजीनामा घेण्याबाबत निवेदन.**

मा. महोदय,

शिवसेना पक्षाचे आमदार संजय गायकवाड यांनी बुधवार, २२ एप्रिल २०२६ रोजी रात्री १२ वाजून ५२ मिनिटांनी ऑल इंडिया स्टुडंट फेडरेशनचे माजी राज्य सेक्रेटरी प्रशांत आंबी यांना गोविंद पानसरे लिखित शिवाजी कोण होता? या पुस्तकाच्या संदर्भात फोनवरून जीवे मारण्याची धमकी देत अत्यंत अश्लील व आक्षेपार्ह भाषेत शिवीगाळ केली आहे. ही बाब अत्यंत गंभीर असून लोकशाही मूल्यांना व अभिव्यक्ती स्वातंत्र्याला बाधा आणणारी आहे.

आमदार संजय गायकवाड यांनी भूतकाळामध्ये अशीच गुन्हेगारी स्वरूपाची कृत्ये केली आहेत. एकूणच त्यांचे वर्तन हे आमदार म्हणून अशोभनिय व महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीला कलंक लावणारे आहेत.

'छत्रपती शिवाजी महाराज हे तुझ्या आईचा नवरा होते काय' असे वक्तव्य करून त्यांनी महाराष्ट्राचे श्रद्धास्थान असलेले छत्रपती शिवाजी महाराज यांचा अपमान केला आहे.

शिवाजी कोण होता? हे पुस्तक इतिहासाचा चिकित्सक व अभ्यासपूर्ण दृष्टिकोन मांडणारे असून, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याचे विवेकी व पुरोगामी विश्लेषण करते. समाजात वैज्ञानिक दृष्टी, समता आणि ऐतिहासिक सत्य जाणून घेण्याची प्रेरणा देणारे हे महत्त्वपूर्ण लेखन आहे. तसेच या अगोदर १९२६ रोजी प्रबोधनकार ठाकरे यांनी असेच चिकित्सक पुस्तक 'दगलबाज शिवाजी' या नावाने लिहिले. त्याचबरोबर गणेश कुऱ्हाडे या लेखकांनी १९३९ रोजी शिवाजी कोण होता? हे पुस्तक लिहिले होते. छत्रपती शिवाजी महाराज विषयी लेखकांना प्रचंड आदर होता. आईला आईच आपण म्हणतो. त्याप्रमाणे महाराजांचा अवमानाचा मुद्दाच येत नाही.



जेव्हा खऱ्या अर्थाने प्रशांत कोरटकर, गोविंद गिरी, राहुल सोलापूरकर, भगतसिंग कोश्यारी हे छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान करतात तेव्हा संजय गायकवाडसारखे लोक हे हेतू पुरस्सर मूग गिळून गप्प बसलेले असतात.

तथापि, आमदार संजय गायकवाड यांनी या पुस्तकाच्या प्रचार-प्रसारावरून प्रशांत आंबी यांना धमकावणे, शिवीगाळ करणे, तसेच जाती-जातींमध्ये तेढ निर्माण होईल असे वक्तव्य करणे, महापुरुषांचा अपमान करणे व महिलांविषयी अश्लील आणि आक्षेपार्ह भाषा वापरणे, हे अत्यंत निंदनीय व कायद्याच्या विरोधात आहे. म्हणून आपणास पुढील मागण्या करत आहोत

१) आमदार संजय गायकवाड यांचा तत्काळ राजीनामा घेण्यात यावा.

२) त्यांच्यावर जी तेढ निर्माण करणे, महापुरुषांचा अपमान करणे व महिलांविषयी अश्लील वक्तव्य करणे या गंभीर गुन्ह्यांखाली तत्काळ गुन्हा नोंदवून अटक करण्यात यावी.

३) गोविंद पानसरे यांच्या खून प्रकरणाच्या तपासामध्ये आमदार संजय गायकवाड यांची सखोल चौकशी करण्यात यावी.

लोकशाही व्यवस्थेत विचार मांडण्याचे स्वातंत्र्य अबाधित राखणे ही शासनाची जबाबदारी आहे. अशा प्रकारच्या धमक्या व बेकायदेशीर कृत्यांना आळा घालण्यासाठी तातडीने कठोर कारवाई करण्यात यावी अन्यथा आम्हाला भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने व पुरोगामी संघटनावतीने राज्यव्यापी आंदोलन करावे लागेल याची नोंद घ्यावी.

**- कॉ. ॲड. सुभाष लांडे**
राज्य सेक्रेटरी,
भारतीय कम्युनिस्ट पक्ष, महाराष्ट्र
**- कॉ. प्रकाश रेड्डी**
राज्य सचिव मंडळ सदस्य
**- कॉ. मिलिंद रानडे**
मुंबई सेक्रेटरी
भारतीय कम्युनिस्ट पक्ष

# वादळी पावसाचा तडाखा! दानोली पंचक्रोशीत महावितरण सेवा ठप्प

■ सावंतवाडी

**सावंतवाडी** तालुक्यात रात्री झालेल्या वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसामुळे दानोली पंचक्रोशीला मोठा फटका बसला आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे महावितरणच्या वीजसेवेला मोठे नुकसान होऊन अनेक भागांतील वीजपुरवठा खंडित झाला आहे.

ओवळीये परिसरात महावितरणच्या विजवाहिन्यांवर मोठी झाडे कोसळल्याने वीज वितरण यंत्रणा ठप्प झाली. यावेळी भाजपाचे बुथ अध्यक्ष सागर सावंत यांनी सहकाऱ्यांसह तत्परता दाखवत विजवाहिनीवर पडलेली झाडे हटवून परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. देवसू खालचीवाडी येथील श्रीदेवी शेंडोबा माऊली मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावर व पारपोलीकडे जाणाऱ्या मार्गावरही मोठी झाडे पडल्याने वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. त्यामुळे स्थानिक नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागला. पारपोली गावात वादळी वाऱ्याचा जोर इतका होता की, दोन घरांची कौले व पत्रे उडून गेली. घरांच्या छपरांचे अंशतः नुकसान झाले. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

# १० लाखांपर्यंतच्या दाव्यांसाठी स्वतंत्र न्यायाधिकरण स्थापन करा

## हायकोर्टाची केंद्र सरकारला सूचना

■ मुंबई

**मोटर** अपघात दावे न्यायाधिकरणातील वाढती प्रलंबित प्रकरणे आणि पीडितांना नुकसानभरपाई मिळण्यास होणारा विलंब यावर उच्च न्यायालयाने गुरुवारी तीव्र चिंता व्यक्त केली. केवळ १० लाख रुपयांखालील दाव्यांसाठी पीडितांना १० ते १५ वर्षे वाट पाहावी लागणे हा त्यांच्यावर होणारा अन्याय आहे, असे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने केंद्र सरकारला अपघात दाव्यांचा वेळीच निपटारा करण्यासाठी स्वतंत्र न्यायाधिकरण स्थापण्याची सूचना केली.

ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीने दाखल केलेल्या अपिलावर न्या. जितेंद्र जैन यांच्या एकलपीठाने निर्णय दिला. सात पानी निकालपत्रात न्यायालयाने प्रलंबित दाव्यांच्या सविस्तर आकडेवारीसह महत्त्वपूर्ण निरीक्षणे नोंदवली. जेव्हा विमा कंपन्या उच्च न्यायालयात अपील करतात, तेव्हा सहसा केवळ ५० टक्के रक्कम काढण्याची परवानगी पीडितांना मिळते. अपघातानंतर ७ ते ८ वर्षांनी पहिल्यांदा पीडिताच्या हातात ही रक्कम पडते. त्यामुळे नुकसानभरपाई देण्याचा मूळ उद्देशच संपून जातो, असे न्यायालयाने म्हटले. याचवेळी १७ मार्च रोजी राज्यसभेत सादर करण्यात आलेल्या आकडेवारीचा संदर्भ न्यायालयाने दिला आहे. त्यानुसार देशभरातील न्यायाधिकरणांमध्ये एकूण १०,७३,०२० दावे प्रलंबित आहेत. या दाव्यांमध्ये तब्बल ९६,२५७ कोटी रुपये अडकले आहेत. याव्यतिरिक्त एकट्या मुंबई उच्च न्यायालयात अपघात दाव्यांसंबंधी १८ हजार अपीले प्रलंबित असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. सध्या देशात १० लाखांहून अधिक अपघात दावे प्रलंबित असून ते दावे वेगाने निकाली काढण्यासाठी केंद्र सरकारने स्वतंत्र 'मोटर वाहन अपिलीय न्यायाधिकरण' स्थापन करण्याचा विचार करावा, अशी सूचना न्या. जैन यांनी केली आहे.




# बुकिंग न करता तुळजाभवानीची पूजा घालणाऱ्या पुजाऱ्यावर गुन्हा

## ५ वर्षे मंदिरात प्रवेशबंदी

■ तुळजापूर

**श्री** तुळजाभवानी मंदिर येथे नियमांचे उल्लंघन करून अनधिकृत सिंहासन पूजा घालणाऱ्या पुजाऱ्याविरोधात मंदिर संस्थानच्या वतीने फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच संबंधित पुजाऱ्यावर पाच वर्षे मंदिरात प्रवेशबंदीची कठोर कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणात सुरक्षा रक्षक कंपनीलाही एक लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे.

मंदिरातील मूर्तीची झीज होऊ नये यासाठी पुरातत्व विभागाच्या निर्देशानुसार सिंहासन पूजांची संख्या मर्यादित ठेवण्यात आली आहे. मंदिर संस्थानकडून सिंहासन पूजेसाठी ऑनलाईन पास प्रणाली लागू करण्यात आली असून, दररोज सकाळ व सायंकाळ मिळून एकूण दहा सिंहासन पूजांचे नियोजन केले जाते. पण २१ एप्रिल रोजी नियमानुसार पाच सिंहासन पूजा होणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात सहा सिंहासन पूजा झाल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे अतिरिक्त सिंहासन पूजा कोणत्या आधारावर मंजूर करण्यात आले, याबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. या प्रकाराची गांभीर्याने दखल घेत मंदिर संस्थानने संबंधित पुजाऱ्याविरोधात गुन्हा दाखल करत त्याला पाच वर्षांसाठी मंदिरात प्रवेशबंदी लागू केली आहे. या घटनेदरम्यान सुरक्षा व्यवस्थापनात त्रुटी आढळून आल्याने सिंग इंटेलिजेंट सिक्युरिटी प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीवर एक लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे.

# नॉन एसी लोकलमधील मराठी सूचना फलक दुरुस्त होणार

**मुंबई** - मध्य रेल्वे कडून स्वयंचलित बंद दरवाजाच्या नॉन-एसी लोकलमध्ये मराठी भाषेला प्राधान्य देण्याचा निर्णय घेण्यात आला असून, अंतर्गत व बाह्य भागातील सूचना फलकांमध्ये मराठीत मजकूर समाविष्ट करण्यास गती देण्यात आली आहे. पुढील चार दिवसांत मराठीतील सर्व सूचना अद्ययावत करण्याबरोबरच शब्दांतील चुका दुरुस्त केल्या जातील, अशी माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. देशातील पहिली स्वयंचलित बंद दरवाजाची नॉन-एसी लोकल काही दिवसांपूर्वी कुर्ला कारशेडमध्ये दाखल झाली असून सध्या तिच्या चाचण्या सुरू आहेत. मात्र, या लोकलमधील सूचना केवळ हिंदी आणि इंग्रजी भाषेत असल्याचे समोर आल्यानंतर वाद निर्माण झाला. मराठीला प्राधान्य न दिल्याबद्दल रेल्वे प्रशासनावर टीका करण्यात आली.

# लाच प्रकरणात नवी मुंबई पालिका उपायुक्त निलंबित

## महापालिका वर्तुळात मोठी खळबळ

■ नवी मुंबई

**नवी** मुंबई महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाचे उपायुक्त डॉ. कैलास गायकवाड यांना ४२ हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आल्यानंतर अखेर त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. या घटनेमुळे महापालिका वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

कंत्राटदाराच्या प्रलंबित बिलांना मंजुरी देण्यासाठी डॉ. गायकवाड यांनी लाचेची मागणी केली होती. अखेरीस ४२ हजार रुपये देण्याचे ठरले. याप्रकरणी संबंधित कंत्राटदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे (एसीबी) तक्रार दाखल केली. त्यानुसार महापालिका मुख्यालयातील त्यांच्या दालनातच लाचेची रक्कम स्वीकारताना एसीबीच्या पथकाने त्यांना रंगेहात पकडले. अटकेनंतर डॉ. गायकवाड यांना न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने त्यांना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. दरम्यान, गंभीर गुन्हा दाखल होऊन अटक झाल्याने महापालिका प्रशासनाने बुधवार २२ एप्रिल रोजी त्यांना शासकीय सेवेतून निलंबित केले आहे.

# दहावी-बारावी खासगी विद्यार्थ्यांची नोंदणी २२ एप्रिलपासून सुरू

## १,२१० रुपये शुल्क आकारले जाणार

■ पुणे

**महाराष्ट्र** राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने जून-जुलै २०२६ मध्ये होणाऱ्या दहावी (माध्यमिक शालांत प्रमाणपत्र) आणि बारावी (उच्च माध्यमिक प्रमाणपत्र) परीक्षांसाठी खासगी विद्यार्थ्यांच्या नावनोंदणी प्रक्रियेची घोषणा केली आहे. नियमित शाळा किंवा महाविद्यालयात शिक्षण पूर्ण करू न शकलेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये, या उद्देशाने मंडळाने फॉर्म क्रमांक १७ द्वारे परीक्षेस बसण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळामार्फत ५ वी किंवा ८ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांनाही दहावी परीक्षेसाठी खासगी विद्यार्थी म्हणून अर्ज करता येणार आहे. या प्रक्रियेची सुरुवात बुधवार २२ एप्रिल २०२६ पासून झाली असून इच्छुक विद्यार्थ्यांनी अधिकृत संकेतस्थळावरून ऑनलाइन अर्ज करणे आवश्यक आहे.

अर्ज व शुल्क भरण्याची अंतिम मुदत २१ मे २०२६ आहे. ऑनलाइन अर्ज भरल्यानंतर त्याची प्रिंटआऊट, शुल्काची पावती आणि आवश्यक मूळ कागदपत्रे संबंधित शाळा किंवा कनिष्ठ महाविद्यालयात निर्धारित कालावधीत जमा करणे बंधनकारक आहे. या प्रक्रियेसाठी केवळ ऑनलाईन अर्जच स्वीकारले जातील. कोणत्याही परिस्थितीत ऑफलाईन अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत. तसेच, मुदतवाढ किंवा विलंब शुल्काची कोणतीही तरतूद नसल्याचे मंडळाने स्पष्ट केले आहे. नावनोंदणीसाठी दहावी आणि बारावी या दोन्ही वर्गांसाठी प्रत्येकी १,११० रुपये नावनोंदणी शुल्क व १०० रुपये प्रक्रिया शुल्क, असे एकूण १,२१० रुपये शुल्क आकारले जाणार आहे. हे शुल्क डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, यूपीआय किंवा नेट बँकिंगद्वारे ऑनलाईन भरावे लागेल.

# अभय हरणे यांनी महानिर्मितीच्या संचालकपदाचा पदभार स्वीकारला

■ मुंबई



**अभय** हरणे यांनी महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (महानिर्मिती) मध्ये संचालक (संचलन) या पदाचा पदभार प्रकाशगड मुख्यालय येथे स्वीकारला. याप्रसंगी महानिर्मितीचे मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी. यांनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. या नियुक्तीपूर्वी हरणे हे महानिर्मितीमध्ये संचालक (प्रकल्प) म्हणून कार्यरत होते, तसेच त्यांनी संचालक (इंधन) या पदाचा अतिरिक्त कार्यभारही सांभाळला आहे. ऊर्जा क्षेत्रातील ३२ वर्षांहून अधिक व्यापक अनुभवाच्या बळावर त्यांनी २१० मेगावॅट ते ६६० मेगावॅट सुपरक्रिटिकल युनिटच्या तसेच संचलन, देखभाल दुरुस्ती व उभारणीमध्ये सखोल कौशल्य प्राप्त केले आहे. महानिर्मितीच्या स्थापित क्षमता विस्तार व नविकरणीय ऊर्जा उपक्रमांना गती देण्यात हरणे यांची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली आहे. विकसित महाराष्ट्र २०४७ अनुरूप महानिर्मितीच्या व्हिजन २०३५ आराखड्याच्या निर्मितीत त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे.

# पालघरमध्ये स्वामिनारायण मंदिर भाविकांसाठी खुले

■ पालघर

**मुंबई-अहमदाबाद** राष्ट्रीय महामार्गावरील दुर्वेस (मनोर) येथे उभारण्यात आलेले भव्य बीएपीएस स्वामिनारायण मंदिर मूर्ती प्रतिष्ठा सोहळ्यानंतर आजपासून भाविकांसाठी खुले करण्यात आले.

मूर्ती प्रतिष्ठा विधी सदगुरू संत पूज्य भक्तिप्रिय स्वामी (कोठारी स्वामी) आणि पूज्य विवेकसागर स्वामी यांच्या हस्ते वैदिक मंत्रोच्चारात संपन्न झाला. यावेळी १,१०० हून अधिक भाविक आणि २०० हून अधिक संत उपस्थित होते.



सुमारे १०.५ एकर क्षेत्रावर उभारलेले हे मंदिर पारंपरिक नागर शैलीतील वास्तुकलेचे उत्कृष्ट उदाहरण मानले जात आहे. मंदिरात तीन भव्य शिखरे, मुख्य घुमटासह ११ लहान घुमट, ५८ कोरीव स्तंभ, २० तोरणे आणि ७७ झरोखे आहेत. तसेच सुमारे १,००० भाविकांची क्षमता असलेला प्रशस्त सभामंडपही येथे उभारण्यात आला आहे. गर्भगृहात भगवान स्वामिनारायण, राधा-कृष्ण, सीता-राम, शिव-पार्वती, हनुमान, गणपती आणि नीलकंठ वर्णी यांच्या मूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. सोहळ्याच्या पूर्वसंध्येला महायज्ञ, नगर यात्रा, लाईट-साऊंड व ड्रोन शो आणि कीर्तन-आराधना यांसारख्या विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी मंत्री गणेश नाईक, मंगल प्रभात लोढा तसेच खासदार डॉ. हेमंत सवरा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# माझगाव डॉक आणि एनएसीई यांच्यात सामंजस्य करारावर सह्या

■ मुंबई



**मुंबई** येथील संरक्षण मंत्रालयाच्या अखत्यारितील भारताची प्रमुख नवरत्न संरक्षण जहाजबांधणी कंपनी माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेड, (एमडीएल)आणि एनएसीई इंटरनॅशनल इंडिया सेक्शन (एनआयआयएस) यांनी आज एमडीएल-एटीएस येथे कौशल्य केंद्र स्थापन करण्यासाठी एका सामंजस्य करारावर (एमओयू) औपचारिकपणे स्वाक्षरी केली. हे केंद्र आंतरराष्ट्रीय मानकांनुसार मरीन ब्लास्टर आणि पेंटरांच्या प्रशिक्षण आणि प्रमाणपत्रासाठी असेल. 'जागतिक गंज जागरूकता दिना'निमित्त मुंबईतील एमडीएल कार्यालयात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्याच्या सोहळ्याला कमांडर वासुदेव पुराणिक, संचालक (कॉर्पोरेट नियोजन आणि कार्मिक), दिपेन झावेरी, अध्यक्ष एएमपीपी इंडिया चॅप्टर, अरुण कुमार चंद, कार्यकारी संचालक एचआर आणि एन मनोहर राव, विश्वस्त - एनआयएसएस उपस्थित होते.

# कल्याण-डोंबिवलीत मंगळवारी १२ तास पाणीपुरवठा बंद

■ कल्याण

**कल्याण-डोंबिवली** महानगरपालिका प्रशासनाने शहरातील पाणीपुरवठा व्यवस्थेबाबत महत्त्वाचा निर्णय घेत मंगळवारी २८ एप्रिल रोजी १२ तास पाणीपुरवठा बंद ठेवण्याची घोषणा केली आहे. देखभाल आणि दुरुस्तीच्या कामांमुळे हा बंद ठेवण्यात येणार असून, नागरिकांना आधीच पुरेसे पाणी साठवून ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून बारावे, मोहिली, नेतिवली आणि टिटवाळा येथील जलशुद्धीकरण केंद्रांवरील विद्युत व यांत्रिक उपकरणांची देखभाल व दुरुस्ती करण्यात येणार आहे. या कामांसाठी मंगळवार २८ एप्रिल रोजी सकाळी ८ ते रात्री ८ वाजेपर्यंत पाणीपुरवठा पूर्णपणे बंद राहणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# प्रभाग समिती 'अ' खारघरअंतर्गत अनधिकृत शेडवर तोडक कारवाई

■ पनवेल



**आयुक्त** मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार प्रभाग समिती 'अ' मार्फत काल खारघर परिसरातील जेजे रसोई बार, अचिजा हॉटेल, एल ताकोस, ब्लू टोकाई, कॉपी रोसस्टर्स, पानाश कॅफे, बाईकरस ब्रेवीस कॅफे, कोटीयार्ड कॅफे अशा विविध हॉटेल्स बाहेरील अनधिकृत शेडवर महापालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून तोडक कारवाई करण्यात आली. महापालिका कार्यक्षेत्रातील चारही प्रभागांमध्ये अतिक्रमणाविरोधात कारवाई करण्याच्या सूचना उपायुक्त नानासाहेब कामठे यांनी दिल्या असून, त्यानुसार चारही प्रभागांमध्ये अतिक्रमणाविरोधात मोठ्या प्रमाणात कारवाई सुरू आहे. प्रभाग अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त सुबोध ठाणेकर तसेच प्रभारी अधीक्षक जितेंद्र मढवी यांच्या उपस्थितीत अतिक्रमण विभागाच्यावतीने जेसीबीच्या सहाय्याने ही तोडक कारवाई करण्यात येत आहे.

# बारबालांना लपविण्यासाठी बारमध्ये गुप्त दालन

■ भाईंदर

**गुन्हे** शाखा १ च्या पथकाने भाईंदर मधील एका बारमध्ये छापा घालून भिंतीच्या मागे तयार करण्यात आलेल्या गुप्त दालनातून लपवण्यात आलेल्या ६ बारबालांची सुटका केली. भाईंदर पूर्वेच्या फाटक रोड येथे अण्णा पॅलेस नावाचा ऑर्केस्ट्रा बार आहे. या बारमध्ये गुप्त दालन असल्याची माहिती गुन्हे शाखा १ च्या पथकाला मिळाली होती. त्यानुसार गुरूवारी रात्री बाराच्या सुमारास बारमध्ये छापा घातला. यावेळी बारच्या पहिल्या मजल्यावरील बाथरूमच्या मागील भिंतीत एक गुप्त दालन असल्याचे आढळले. त्या छोट्या दालनात ६ तरुणी दाटीवाटीने लपविण्यात आल्या होत्या. डान्स फ्लोरवर ४ आणि मेकअप रुपमध्ये ३ मुली होत्या. हे गुप्त दालन पाहून पोलीसही हैराण झाले. बाहेरून कुणालाही कल्पना येणार नाही अशा पध्दतीने त्याची रचना करण्यात आली होती.





संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# निराशेने पछाडलेले डोनाल्ड ट्रम्प

**इराण,** अमेरिकेतील युद्ध काही काळापुरते स्थगित झालेले आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दोन आठवड्यासाठी युद्धबंदीची घोषणा केली. त्या दोन आठवड्याच्या दरम्यान इराणबरोबर चर्चा घडवून आणण्याचाही त्यांनी प्रयत्न केला. परंतु त्यालाही अपेक्षित यश न आल्याने सध्या ट्रम्प यांना निराशेने चांगलेच पछाडलेले आहे. त्यांच्या तोंडून कधी कोणत्या आणि कशा प्रकारचे उद्‌गार निघतील याचा काही नेम नसतो. इराण, अमेरिका युद्ध भडकण्यासाठीसुद्धा त्यांची ही अनाठायी बडबड आणि अतिशयोक्तीच कारणीभूत ठरली. जगातला सर्वात शक्तीशाली राष्ट्राचा हा अध्यक्ष आज आपल्याच वेगवेगळ्या भूमिकांमुळे सर्वात कमकुवत राष्ट्राध्यक्ष म्हणून जगामध्ये ओळखला जाऊ लागला आहे. आपल्या देशाची सर्वाधिक काळजी घेणारे केवळ आपणच आहोत आणि दोलायमान असलेली अमेरिकेची आर्थिक स्थिती केवळ आपणच पूर्वपदावर आणू शकतो, असा त्यांचा फार मोठा गैरसमज दिसतो. म्हणूनच त्यांनी गेल्या वर्षभरामध्ये एक ना अनेक प्रकारचे निर्णय घेऊन प्रत्यक्ष आपल्या देशाला आणि आपल्या मित्रराष्ट्रांनादेखील दुखावण्याचेच काम केले आहे. इराणबरोबरचे युद्ध सुरू झाल्यानंतर त्यांच्याविरोधात अमेरिकेतच निदर्शने व्हावीत. हाही अजब प्रकार घडून आला होता. त्यापूर्वी अनेक युरोपीय राष्ट्रांना वेठीला धरण्याचा प्रयत्न त्यांनी केला. अगदी ज्या युरोपीय राष्ट्रांची नाटो ही संघटना आहे. तिच्याशीदेखील ट्रम्प यांनी आपले संबंध बिघडवले आहेत. स्वाभाविकपणे अनेक युरोपिय राष्ट्र आज ट्रम्प यांच्या भूमिकांना उघड उघड विरोध करताना दिसून येतात. भारत हा अमेरिकेचा जवळचा मित्र मानला जातो. तशा प्रकारचे संबंध टिकवण्याचा भारताने प्रयत्न केलेला आहे. परंतु ट्रम्प यांची दुसरी टर्म ही भारतासाठी मोठीच डोकेदुखी ठरली असे म्हणण्याची वेळ येते. सुरूवातीला भारतीयांना व्हिजा देण्याच्या प्रकरणावरून त्यांनी कठोर भूमिका घेतली त्यानंतर जवळपास शंभर टक्के टेरिफ वाढवून भारताला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला. आणि आता अगदी अलिकडे भारत आणि चीन ही दोन्ही राष्ट्र म्हणजे नरकयातना असणारी राष्ट्र आहेत असे बेताल विधान त्यांनी केले.

### उटपटांग विधान

ट्रम्प यांच्या या भारतविरोधी विधानावर भारत सरकारने तर कठोर शब्दांत आक्षेप नोंदवला आहेच. परंतु जगभरातील आणि अमेरिकेतल्या भारतीयांकडूनही यासंदर्भात ट्रम्प यांची चांगलीच हजेरी घेतली गेली आहे. आपल्या विधानावर व्यक्त झालेला संताप त्यांनी ओळखला आणि त्यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी पुन्हा घुमजाव करून भारत हे एक महान राष्ट्र आहे. असे म्हणत सारवासारव करण्याचा प्रयत्न केला. दर दोन तीन दिवसाआड ट्रम्प यांची अशा प्रकारची उटपटांग विधाने आणि अस्थिर स्वरूपाच्या भूमिका पाहायला मिळत आहेत. जगातल्या अनेक राष्ट्रांना ट्रम्प यांच्याबरोबर वागायचे कसे असाच प्रश्न पडलेला आहे. सगळी राष्ट्रे आपली बटिक असली पाहिजेत, असा त्यांचा आग्रह दिसतो. परंतु आता अमेरिका स्वतःला जी काही सुपरपॉवर समजत होती तशी ती आता राहिलेली नाही. केवळ तंत्रज्ञान आणि सैनिकी बळावर आपण जगातल्या कोणत्याही देशाला वाकवू शकतो. असा ट्रम्प यांचा जो दावा होता. तो फोल ठरलेला आहे. उलट तंत्रज्ञानातून आज जगातल्या अनेक राष्ट्रांना स्वतःचा वेगाने विकास करून घेता आलेला आहे. शस्त्रसामर्थ्यापेक्षाही अर्थविकासावरून त्या राष्ट्राची कार्यक्षमता आणि सामर्थ्य ओळखले जाऊ लागले आहे. शस्त्रसामर्थ्यातून स्वतःला महासत्ता म्हणवून घेण्याचे दिवसही आता मागे पडले आहेत. जो देश आर्थिक महासत्ता असेल त्याच्याविषयी जगभरात आदर वाढत असतो आणि त्या देशाचे सामर्थ्यही मान्य केले जाते. गेल्या काही वर्षात अमेरिकेतली आर्थिक परिस्थिती खूपच बिघडलेली आहे. ती सावरण्यासाठी ठोस उपाय करण्याऐवजी ट्रम्प यांच्याकडून चित्रविचित्र निर्णय घेतले गेले आणि त्याचा उलटा फटका अमेरिकेलाच बसला. अशा परिस्थितीत इराणबरोबरचा संघर्ष ओढवून त्यांनी अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेला आणखीनच धक्का दिलेला आहे. इराणच्या युद्धात कोणत्याच प्रकारचे यश हाती लागेललं नाही. कोणत्याही परिस्थितीत आपण इराणमध्ये सत्तांतर घडवून आणू असा त्यांचा दावा होता तोही फोल ठरला.

### भारताचे वाढते सामर्थ्य

इस्त्रायलच्या मदतीने इराणच्या अनेक प्रमुख नेत्यांच्या हत्या केल्या गेल्या. अगदी संरक्षण दलाच्या प्रमुख नेत्यांनाही ठार केले गेले. यानंतर इराण आपोआप चर्चेसाठी तयार होईल अशी ट्रम्प यांची समजूत होती. परंतु लांबलेल्या या युद्धाने जगातल्या अनेक राष्ट्रांच्या व्यापारावर परिणाम झाला. अमेरिकेलाही त्याची झळ पोहोचली. नंतर त्यांनी पाकिस्तानच्या मदतीने इराणबरोबर चर्चा करण्याचा घाट घातला. जो पाकिस्तान अत्यंत बेभरोशाचा देश मानला जातो त्याच्या मध्यस्थीने सुरू झालेली चर्चा यशस्वी होऊ शकलेली नाही. म्हणजे चर्चेसाठी पाकिस्तानची केलेली निवड हादेखील एक जुगार ठरतो आहे. इराण आणि पाकिस्तानचे संबंध ठाकठीक असले तरी पाकिस्तान हा अमेरिकेचा हस्तक आहे तो आपल्याला मदत करू शकणार नाही. याबद्दल इराणला खात्री असल्याने ती चर्चाच पुढे सरकू शकलेली नाही. एकूणच ट्रम्प यांनी युद्ध सुरू करण्यापासून ते चर्चेचे प्रयत्न करण्यापर्यंत ज्या ज्या काही भूमिका घेतल्या तर त्या सगळ्याच अर्धवट स्वरूपाच्या ठरल्या. त्या निराशेतून आता ट्रम्प यांच्या तोंडून अशा प्रकारचा वाचाळपणा होतो आहे. आज जागतिक स्तरावर भारत अशा स्थितीत पोहोचला आहे की, अमेरिकाच काय पण कोणत्याच देशाला भारताबरोबरच शत्रूत्व परवडणारे नाही. अगदी भारताविरुद्ध सतत कुरापती करणारा चीनदेखील भारताबरोबरचे संबंध शक्य तितके सुरळीत ठेवण्याचा प्रयत्न करतो आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे भारत आज जगातील तिसरी प्रमुख आर्थिक महासत्ता झालेली आहे. भारताचे हे सामर्थ्य ट्रम्प यांना मान्य करण्याशिवाय पर्यायही उरत नाही.


## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

स्वतःला कमी समजणं ही सर्वात मोठी चूक आहे
कारण प्रत्येकामध्ये काहीतरी खास असते,
फक्त त्यावर विश्वास ठेवण्याची गरज असते.

## पंचांग

**शनिवार, २५ एप्रिल २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**



* वैशाख शुक्ल नवमी
* नक्षत्र - आश्लेषा
-: जन्मराशी :-
००-०१ ते २०-०४ कर्क
२०-०५ ते २४-०० सिंह

रवी उदय- ०६-१६
रवी अस्त- १८-५८

**सीता नवमी, जानकी जन्म**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती

### भरले टोमॅटो



★ **साहित्यः-** ५ ते ६ टोमॅटो, ५ ते ६ उकडलेले बटाटे, १ टेबलस्पून लाल तिखट, १ टीस्पून हळद, १ टेबलस्पून गरम मसाला, ५० ग्रॅम चीझ, १० ते १२ काजू पेस्ट, १ टेबलस्पून धना पावडर, ७ /८ कढीपत्ता पाने, चवीप्रमाणे मीठ, फोडणीसाठी तेल, २ हिरव्या मिरच्या, १ टेबलस्पून चाट मसाला, १ टेबलस्पून आले लसूण पेस्ट.

★ **कृती :-** प्रथम टोमॅटो देठाच्या साईडने कट करून घ्यावे. आतील भाग काढून घेऊन मधला भाग सारण भरण्यासाठी मोकळा ठेवावा.

बटाटा उकडून कुस्करून घ्यावा. सारण करण्यासाठी तेल दोन ते तीन चमचे घ्यावे. त्यात कांदा बारीक चिरून लालसर होईपर्यंत परतून घ्यावा. नंतर त्यात आले लसूण पेस्ट तेल सुटेपर्यंत परतून घ्यावे. सर्व मसाले हळद त्यात चांगले परतून घ्यावे. लगेच त्यात कुस्करले बटाटा, काजू पेस्ट मिक्स करून घ्यावे. त्यातच चीझ घालून गॅस बंद करावा. सारण तयार आहे.

टोमॅटोच्या आतील भागात पूर्णपणे सारण भरून घ्यावे आणि कढईत तेल तापवून त्यात कढीपत्ता हिरवी मिरची परतून टोमॅटोच्या बाहेरील बाजूस मीठ लावून भांड्यात शिजू द्यावे. थोड्या थोड्या वेळाने सर्व बाजूने टोमॅटो शिजवून घ्यावा.

## क्रीडा

# बंगळुरुने गुजरातला ५ विकेट राखून नमवले
## विराटची वादळी खेळी! साई सुदर्शनचे शतक वाया



**विराट कोहली (८१) आणि देवदत्त पडिक्कल (५५) यांच्या ११५ धावांच्या धडाकेबाज भागीदारीच्या बळावर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुने गुजरात टायटन्सला ५ गडी आणि ७ चेंडू शिल्लक राखून नमवले. या पाचव्या विजयासह बंगळुरु आयपीएलच्या गुणतालिकेत १० गुणांसह दुसऱ्या स्थानावर पोहोचला. बंगळुरुमध्ये झालेल्या आयपीएलच्या ३४ व्या सामन्यात साई सुदर्शनच्या शतकी खेळीच्या जोरावर गुजरातने ३ बाद २०५ धावा केल्या होत्या. या प्रत्युत्तरात बंगळुरुने १८.५ षटकांत ५ बाद २०६ धावा ठोकल्याने गुजरातला चौथा पराभव पत्करावा लागला.**

■ बंगळुरु

**बंगळुरुने** नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. गुजरातचा सलामीवीर साई सुदर्शनने सुरुवातीपासून बंगळुरुच्या गोलंदाजांवर हल्ला चढवून चौकार आणि षटकार ठोकले. शुभमन गिलने सावध खेळी करून त्याला उत्तम साथ दिली. या जोडीने संघाची धावसंख्या १२.४ षटकांत १२८ वर पोहोचवली. गिलने सुयश शर्माच्या गोलंदाजीवर षटकार मारण्याच्या नादात पडिक्कलकडे झेल दिला. त्याने २४ चेंडूंत १ षटकार आणि २ चौकारांसह ३२ धावा केल्या. त्यानंतर साई सुदर्शनने जोस बटलरच्या साथीत आपली फटकेबाजी सुरू ठेवली होती. मात्र तो ५८ चेंडूंत ५ षटकार आणि ११ चौकारांसह शतक पूर्ण करून झेलबाद झाला. मग बटलर १६ चेंडूत १ षटकार आणि २ चौकारांसह २५ धावांवर बाद झाला. शेवटी वॉशिंग्टन सुंदर १२ चेंडूंत १९ धावा आणि जेसन होल्डर १० चेंडूत २३ धावा करून नाबाद राहिला. त्यामुळे गुजरात ३ बाद २०५ धावांपर्यंत पोहोचू शकला.

या धावसंख्येचा पाठलाग करताना बंगळुरुचा सलामीवीर विराट कोहलीचा पहिल्या षटकात वॉशिंग्टन सुंदरने सोपा झेल सोडला. मोहम्मद सिराजने जेकब बेथेलला (१४) शिकार बनवून तंबूत धाडले. विराट कोहली आणि देवदत्त पडिक्कल या जोडीने चांगली फटकेबाजी करून धावसंख्येला आकार दिला. पडिक्कलने २० चेंडूंत अर्धशतक पूर्ण केले. त्यापाठोपाठ विराटने ३० चेंडूंत अर्धशतक साकारले. त्यानंतर या जोडीने आक्रमक फलंदाजीला आणखी धार चढवली. मात्र संघाची धावसंख्या १२.२ षटकांत १४१ वर पोहोचली असता रशीद खानने पडिक्कलचा त्रिफळा उडवला. त्याने २७ चेंडूंत ५५ धावा केल्या. विराटला ८१ धावांवर जेसन होल्डरने बाद केले. मात्र तोपर्यंत हा सामना बंगळुरुच्या बाजूने झुकला होता. त्यानंतर जितेश शर्माला (१०) रशीद खानने माघारी धाडले. रजत पाटीदार ८ धावांवर झेलबाद झाला. टिम डेव्हिडच्या साथीत कुणाल पंड्याने फटकेबाजी करून संघाला १८.५ षटकांत विजयी आकडा गाठून दिला.



## हॉकी गोलकीपर प्रिन्स आशियन गेममधून बाहेर

■ नवी दिल्ली

**२०२६ च्या** आशियन गेमपूर्वी भारतीय पुरुष हॉकी संघाला मोठा धक्का बसला. आशियन गेमनिमित्त सराव शिबिरात सहभागी असलेला गोलरक्षक प्रिन्सदीप सिंग जखमी झाला. त्याच्या डाव्या खांद्याला झालेल्या दुखापतीवर शस्त्रक्रिया केली जाणार आहे. ज्युनियर हॉकी विश्वचषकाच्या उपांत्यपूर्व फेरीत बेल्जियमविरुद्धच्या पेनल्टी शूटआऊटमधील प्रभावी कामगिरीमुळे तो प्रकाशझोतात आला होता. ज्यामुळे भारताला उपांत्य फेरी गाठण्यास मदत झाली होती. डिसेंबरमध्ये चेन्नईत झालेल्या ज्युनियर विश्वचषक स्पर्धेत भारताला कांस्यपदक मिळवून देण्यात प्रिन्सने महत्त्वाची भूमिका बजावली होती. या आठवड्यात मुंबईत प्रसिद्ध सर्जन डॉ. दिनशा परडीवाला यांच्याकडून प्रिन्सच्या खांद्यावर शस्त्रक्रिया केली जाणार आहे. शस्त्रक्रियेनंतर त्याला पूर्णपणे बरे होण्यासाठी सहा महिन्यांपर्यंतचा कालावधी लागू शकतो, तर दुसरीकडे १९ सप्टेंबरपासून ऐची आणि नागोया येथे आशियन गेम सुरू होणार आहेत. त्यामुळे त्याच्या खेळण्याची शक्यता जवळपास नाहीच.

## पीएसएलसाठी मुस्तफिजुरला दिलेली एनओसी मागे घेतली

■ ढाका

**बांगलादेश** क्रिकेट बोर्डाने (बीसीबी) वेगवान गोलंदाज मुस्तफिजुर रहमानला पाकिस्तान सुपर लीगमध्ये (पीएसएल) खेळण्यासाठी दिलेली ना हरकत प्रमाणपत्र (एनओसी) मागे घेऊन पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला मोठा धक्का दिला. न्यूझीलंडविरुद्धच्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यानंतर झालेल्या त्याच्या वैद्यकीय तपासणीच्या आधारावर हा निर्णय घेण्यात आला.

बीसीबीने सांगितले की, न्यूझीलंडविरुद्धचा तिसरा एकदिवसीय सामना संपल्यानंतर संघाच्या वैद्यकीय पथकाने मुस्तफिजुरच्या तंदुरुस्तीचा आढावा घेतला. पुढील मूल्यांकनासाठी त्याच्यावर तातडीने स्कॅन केले जातील. त्यानंतर तो बीसीबीच्या वैद्यकीय पथकाच्या देखरेखीखाली पुनर्वसन प्रक्रिया सुरू करेल. त्याला यापूर्वी देण्यात आलेली ना हरकत प्रमाणपत्र (एनओसी) मागे घेण्यात आले आहे. त्यामुळे तो पीएसएल २०२६ च्या उर्वरित सामन्यांमध्ये सहभागी होऊ शकणार नाही.

## न्यूझीलंडची सुझी बेट्स विश्वचषकानंतर निवृत्त होणार

■ वेलिंग्टन

**न्यूझीलंडची** अष्टपैलू खेळाडू सुझी बेट्स इंग्लंडमध्ये होणाऱ्या टी-२० विश्वचषकानंतर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त होणार असून, यासह तिच्या २० वर्षांच्या कारकिर्दीचा शेवट होईल.

सुझी बेट्स मे महिन्याच्या सुरुवातीला इंग्लंडच्या एकदिवसीय आणि टी-२० द्विपक्षीय दौऱ्यासाठी संघासोबत रवाना होईल. न्यूझीलंड गतविजेता असून आणखी एक विजेतेपद जिंकणे हे आपले ध्येय असल्याचे बेट्सने सांगितले. तिने २००३ मध्ये वयाच्या १५ व्या वर्षी देशांतर्गत क्रिकेटमध्ये आणि २००६ मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले. ती महिलांच्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये (४७१७) सर्वाधिक धावा करणारी खेळाडू आहे आणि महिलांच्या एकदिवसीय सामन्यांमध्ये (५९६४) चौथ्या क्रमांकावर आहे.

## ऑलिम्पिक २०२८ चे क्रिकेट सामने कॅलिफोर्नियाच्या पोमोनामध्ये होणार

■ कॅलिफोर्निया

**२०२८ मध्ये** होणाऱ्या लॉस एंजिल्स ऑलिम्पिकसाठी क्रिकेट स्टेडियमचे बांधकाम अधिकृतपणे सुरू झाले असून कॅलिफोर्नियातील पोमोना येथे झालेल्या भूमिपूजनामुळे १२८ वर्षांनंतर क्रिकेट ऑलिम्पिकमध्ये परत येण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल टाकले.सर्व सामने लॉस एंजिल्सपासून ५० किलोमीटर दूर असलेल्या पोमोना येथील फेअरग्राउंड्स मैदानावर खेळले जातील.

## बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या संघाला विजेतेपद

■ मुंबई

**एसएनडीटी** महिला विद्यापीठाच्या जुहू कॅम्पसमध्ये असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज यांच्या वतीने झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ खो-खो स्पर्धेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने विजेतेपद पटकावले, तर एसएनडीटी विद्यापीठाने उपविजेतेपद मिळवले. या स्पर्धेत तृतीय क्रमांक मुंबई विद्यापीठाने व चतुर्थ क्रमांक पुणे विद्यापीठाने पटकावला.

अंतिम सामन्यांत पहिल्या डावात एसएनडीटी विद्यापीठाने ४ गुण मिळवले, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने ७ गुणांची कमाई करत ३ गुणांची आघाडी घेतली. दुसऱ्या डावात एसएनडीटीने ५ गुण मिळवत विजयासाठी २ गुणांचे आव्हान उभे केले. मात्र, अखेरच्या क्षणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने संयमित खेळ करत विजयावर शिक्कामोर्तब केले.

**महावितरण**

**ई-निविदा सूचना**

महावितरणच्या महाराष्ट्रातील कार्यालयांसाठी विविध प्रकारची ई-वाहने पुढील १० वर्षांसाठी भाडेतत्त्वावर घेण्याकरिता पात्र बोलीदाता/ एजन्सीज/अ‍ॅग्रिगेटर्स/मूळ उपकरण निर्मात्यांकडून निविदा क्र. CEC/CCO/T-01/2026-27 अन्वये बोली (बिड्स) मागविण्यात येत आहेत. निविदा फक्त इलेक्ट्रॉनिक निविदा प्रणालीमधूनच प्रक्रिया केली जातील आणि महावितरणच्या कामकाजासाठी ई-निविदा प्रणालीवर नोंदणी केलेल्या विक्रेत्यांसाठी खुली असेल. बिड कागदपत्रे २५.०४.२०२६ ते ०८.०६.२०२६ दुपारी ०१.०० पर्यंत संकेतस्थळावर उपलब्ध राहतील. निविदा सादर करण्यासाठी मुदत ०८.०६.२०२६ दुपारी ०३.०० पर्यंत आहे. अधिक तपशीलासाठी आणि अद्यतनांसाठी आमच्या संकेतस्थळावर www.mahadiscom.in ला भेट द्यावी. बोलीदातांना या आणि भविष्यातील ई-निविदा साठी स्वतः ची नोंदणी करणे आवश्यक आहे.

सही/-
ज.सं. क्र. १०४/२६ दि. २४.०४.२०२६ मुख्य अभियंता (स्थापत्य)

**जाहीर सूचना**

**सदर सूचना देण्यात येत आहे की माझे अशिल विंग बी, लोढा मस्ट हॅव, सिम्प्रेट-फेज २, लोढा पार्क सिम्प्रेट फेज-२, सेनापती बापट मार्ग, लोअर परळ, मुंबई - ४०००१३ येथील सहाव्या मजल्यावरील युनिट क्र.६५४ (यापुढे सदर युनिट असा उल्लेख) खरेदी करण्याचा मानस ठेवत आहेत, ज्याचे कार्पेट क्षेत्रफळ ६०१ चौ. फूट असून त्यासोबत दोन कार पार्किंग जागा आहेत, सदर मालमत्ता सीटीएस क्र.४६४, लोअर परळ विभाग, मुंबई शहर या जमिनीवर स्थित असून ती विक्रेते/हस्तांतरणकर्ते/विक्रेते श्री. हर्ष मोहनसिंग बापना यांच्याकडून खरेदी करण्यात येत आहे. कोणा व्यक्तिस सदर युनिट विरुद्ध विक्री, करार, कंत्राट, विनिमय, एमओयू, भेटवस्तू, धारणाधिकार, गहाण, कर्ज, शुल्क, भाडेपट्टा, वहिवाट, व्यवसाय, ताबा, आराम, वारसा, ट्रस्ट, खटला, राहण्याचा हक्क, देखभाल आणि प्रलंबित खटला याद्वारे कोणताही दावा किंवा कोणतेही हितसंबंध असल्यास त्यांनी त्याच्या तारखेपासून १४ दिवसांच्या आत अधोस्वाक्षरी करणाऱ्यांना सहाय्यक कागदोपत्री पुराव्यांसह लेखी कळवणे आवश्यक आहे. जर येथे आवश्यकतेनुसार कोणताही दावा प्राप्त झाला नाही किंवा केला गेला नाही, तर असे गृहित धरले जाईल की सदर युनिटमधील किंवा त्यावर असा कोणताही दावा माफ केला आहे आणि/ किंवा सर्व हेतू आणि उद्देशांकरिता त्याग केला आहे आणि तो माझ्या अशिलांवर बंधनकारक नसेल आणि माझे अशिल सध्याच्या मालकासह खरेदी व्यवहार पूर्ण करेल आणि अशा दाव्याचा कोणताही संदर्भ न घेता सदर व्यवहार पूर्ण केले जाईल आणि जर काही असल्यास ते माफ केले आहे असे समजले जाईल.**

सही/-
वकिल महावीर के रांभिया
वुडलँड क्रेस्ट, पहिला मजला, विजय नगर समोर, पलोती चर्च जवळ मरोळ मरोशी रोड, मरोळ, अंधेरी (पू), मुंबई ४०० ०५९
ठिकाण: मुंबई,
दिनांक: २५.०४.२०२६

**जाहीर सूचना**

**सदर सूचना आमच्या अशिलांच्या वतीने सर्वसामान्य जनतेस देण्यात येत आहे की,** आम्ही अनुसूचीतील प्लॉटच्या शिर्षकाची चौकशी आम्ही करीत आहोत, ज्याची मालकी मे. अ‍ॅकमे कन्स्ट्रक्शन्स या संस्थेकडे असून ही एक एकल मालकीची संस्था असून श्री.अकरमअली कुरेशी यांच्याशी संबंधित आहे, त्यांचा कार्यालयाचा पत्ता ५०३, चार्टर हाऊस, २९५, डॉ. सी. एच. स्ट्रीट, मुंबई - ४००००२ असा आहे.
जर कोणत्याही व्यक्ती/कंपनी/फर्मला खाली नमूद केलेल्या अनुसूचीतील मालमत्तेबाबत कोणताही आक्षेप, दावा, वाद, हितसंबंध, खटला किंवा हक्क असल्यास, त्यांनी त्यासंबंधी कागदपत्रांसह आपले आक्षेप/दावे/वादाचे तपशील या सूचनेच्या प्रकाशन दिनांकापासून सात (७) दिवसांच्या आत खाली सही करणाऱ्यांशी संपर्क साधावा, अन्यथा, वरील मुदतीत कोणताही आक्षेप/दावा प्राप्त न झाल्यास, सदर अनुसूचीतील मालमत्तेबाबत कोणतेही तृतीय पक्षाचे दावे/आक्षेप/वाद नसल्याचे गृहीत धरून आम्ही शिर्षक प्रमाणपत्र/बोजारहित प्रमाणपत्र जारी करण्याची कार्यवाही करू, त्यानंतर कोणतेही दावे/आक्षेप/वाद ग्राह्य धरले जाणार नाहीत.


**प्लॉटची अनुसूची**

जमीन अथवा भूखंड ज्यावर उभारलेली मेसुएज/टेनमेंट/निवासी घरे असून ती म्हात्रे चाळ क्र.५ या नावाने ओळखली जाते, जी पहाडी, गोरेगाव (पूर्व), मुंबई येथे स्थित आहे, जे मुंबई शहर व उपनगर या नोंदणी जिल्हा व उपजिल्ह्यात येते, एकूण क्षेत्रफळ ९४५.०२ चौ. मीटर असून, त्यापैकी चाळीत १५ खोल्या असून त्यांचे क्षेत्रफळ ९११.९१ चौ. मीटर आहे व उर्वरित ३३.२९ चौ. मीटर मोकळी जागा आहे, जे सर्व्हे क्र. ८५ ते ८७ (१) ते ८७ (१५) अंतर्गत असून तिच्या चतुसिमा पुढीलप्रमाणे:
अ) पूर्वेस :
कुलदीप सिंग दिवाण हायस्कूल
ब) पश्चिमेस :
पांडुरंग वाडी मुख्य रस्ता
क) उत्तरेस :
श्री. कोरे यांची मालमत्ता, ज्यास कोरे निवास म्हणून ओळखले जाते
ड) दक्षिणेस :
पांडुरंगवाडी क्रॉस रोड क्र. ३

सही/-
**म्हात्रे लॉ असोसिएट्स**
कार्यालय : चेंबर क्र. १, म्हात्रे लॉ असोसिएट्स, आयसीआयसीआय बँकेजवळ, दत्तपाडा, बोरीवली (पूर्व), मुंबई - ४०००६६.
ईमेल : sachin@malw.in
मोबाईल क्र. : ९८२०३४३४३०
दिनांक : २५ एप्रिल, २०२६
ठिकाण : मुंबई.

# सुरत पालिका निवडणुकीपूर्वी मुख्यमंत्र्यांची भव्य बाईक रॅली

सुरत



**पालिका** निवडणुकीचा प्रचार संपण्याच्या काही दिवस आधीच राजकीय ताकदीचे मोठे प्रदर्शन करत गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनी सुरतच्या मध्यवर्ती भागातून सुमारे ५ किमीची भव्य बाईक रॅली काढली. येत्या सुरत महानगरपालिका निवडणुकांमध्ये वर्चस्व मिळवण्यासाठी भाजपाचा हा प्रयत्न आहे.

ही रॅली वराछा आणि कतारगाम या पाटीदारबहुल भागांतून गेली. वॉर्ड क्रमांक १४ ते १७ पर्यंतच्या मार्गावर मोठी गर्दी, पक्षाचे कार्यकर्ते आणि कडेकोट पोलीस बंदोबस्त होता. काही तासांतच संपूर्ण मार्ग सुरक्षा छावणीसारखा दिसू लागला. प्रशासनाने कडक नजर ठेवली होती. ही फक्त रॅली नाही, तर मुख्यमंत्री स्वतः सुरतच्या प्रचाराची धुरा सांभाळत असल्याचा संदेश आहे, असे भाजपाचे राज्य सरचिटणीस प्रशांत कोरट यांनी सांगितले. तेही या मिरवणुकीत सहभागी झाले होते. सीमाडा नाका ते हिराबाग सर्कल या रॅलीनंतर संपूर्ण शहरात पोलीस बंदोबस्त अधिक कडक करण्यात आला होता. गर्दी नियंत्रणात ठेवण्यासाठी आणि वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी वाहतूक वळवणे, बॅरिकेड आणि गस्त पथके तैनात करण्यात आली होती. सुरतची पालिका निवडणूक ही प्रतिष्ठेची लढाई बनली आहे. मुख्यमंत्र्यांच्या रोड शोला मिळालेल्या प्रतिसादावरून हे दिसून आले.

देश विदेश

# डेन्मार्कमध्ये दोन ट्रेनची धडक! १७ जण जखमी

कोपेनहेगन



**डेन्मार्कमध्ये** कोपनहेगनच्या उत्तरेला ४० किलोमीटर अंतरावर असलेल्या ग्रिब्स्कोव्ह येथे दोन ट्रेनची समोरासमोर धडक होऊन १७ जण जखमी झाले. त्यापैकी चौघांची प्रकृती गंभीर आहे. ग्रिब्स्कोव्ह नगरपालिकेच्या महापौर ट्राइन एगेटवेड यांनी फेसबुकवर सांगितले की, काही जखमींना हेलिकॉप्टरने रुग्णालयात नेण्यात आले.

हिलरोड आणि कागेरुप या शहरांच्या दरम्यान टक्कर झालेल्या दोन ट्रेन्सच्या पुढच्या इंजिनचा पूर्णपणे चेंदामेंदा झाला. या घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि रेल्वेचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. आणि त्यांनी स्थानिकांच्या मदतीने ट्रेनमधून सर्व प्रवाशांना बाहेर काढले. जखमींना रुग्णालयात दाखल केले. या ट्रेनचा वापर ग्रिब्स्कोव्हचे अनेक रहिवासी, कामगार आणि विद्यार्थी करतात. गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये, एका क्रॉसिंगवर एक्स्प्रेस ट्रेनने ट्रकला धडक दिल्याने एका व्यक्तीचा मृत्यू झाला.

# बलुचिस्तानमध्ये खाणकाम सुरू असताना गोळीबार! ९ जण ठार

क्वेटा

**बलुचिस्तानच्या** चगाई जिल्ह्यातील तांबे आणि सोन्याच्या खाणकाम सुरु असताना हल्लेखोरांनी केलेल्या गोळीबारात ९ जणांचा मृत्यू झाला. सर्व मृतदेह दलबंदिन येथील प्रिन्स फहद रुग्णालयात नेण्यात आले.पाकिस्तानच्या मानवाधिकार आयोगाने (एचआरसीपी) एक्सवर प्रसिद्ध केलेल्या एका निवेदनात या घटनेचा निषेध केला.

नॅशनल रिसोर्सेस लिमिटेड (एनआरएल) ही लकी सिमेंट, फातिमा फर्टिलायझर आणि लिबर्टी मिल्स यांच्या संयुक्त उपक्रमातून स्थापन झालेली एक पाकिस्तानी खाणकाम कंपनी आहे. ही कंपनी चगाईमध्ये तांबे-सोने



आणि शिसे-जस्त यांच्या साठ्यांचा सक्रियपणे शोध घेत असून या उपक्रमात लकी सिमेंटची ३३.३३ टक्के इक्विटी हिस्सेदारी आहे.

# मांडवी नदीत नव्या कॅसिनो बोटीविरोधात याचिका

२७ एप्रिलला सुनावणी

पणजी

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

**मांडवी** नदीत डेल्टीन कंपनीची मोठी कॅसिनो बोट आणण्याच्या हालचालींविरोधात जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. 'इनफ इज इनफ'सह सामाजिक कार्यकर्त्यांनी ही याचिका दाखल केली असून पुढील सुनावणी २७ एप्रिल रोजी होणार आहे. सध्या असलेल्या ७० प्रवासी क्षमतेच्या बोटीऐवजी सुमारे २ हजार प्रवासी क्षमतेची मोठी बोट आणण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला आहे. ही परवानगी गोवा सार्वजनिक जुगार कायदा व शासनाच्या नियमांना बगल देऊन दिल्याचा दावा करण्यात आला आहे.

या प्रकरणी लिबिया लोबो सरदेसाई, उदय भेंब्रे, सुदीप ताम्हणकर आणि हरीश मडकईकर यांनी याचिका दाखल केली आहे. राज्य सरकार आणि डेल्टा प्लेझर क्रूझ कंपनी प्रायव्हेट लिमिटेड यांना प्रतिवादी करण्यात आले आहे. सुनावणीदरम्यान, ज्येष्ठ वकील एस. मुरलीधर यांनी ही बोट उडपीहून गोव्याकडे येत असल्याचा मुद्दा मांडत, सुनावणी पूर्ण होईपर्यंत ती माघारी पाठवण्याची मागणी केली. दरम्यान, ॲडव्होकेट जनरल देविदास पांगम यांनी सांगितले की, बोटीला परवानगी देण्यापूर्वी नदीची पाहणी करण्यात आली असून अहवाल न्यायालयात सादर केला जाईल.

# ७ महिन्यांच्या गर्भवती अल्पवयीन मुलीला गर्भपाताला कोर्टाची परवानगी

नवी दिल्ली

**सर्वोच्च** न्यायालयाने सात महिन्यांपेक्षा अधिक गर्भवती असलेल्या अल्पवयीन मुलीला स्वेच्छेने गर्भपाताची परवानगी दिली आहे. संबंधित मुलीची स्पष्ट इच्छा, मानसिक ताण आणि आरोग्याची स्थिती लक्षात घेऊन न्यायालयाने कोणालाही तिच्या इच्छेविरुद्ध प्रसूतीस भाग पाडता येणार नसल्याचेही स्पष्ट केले. न्या. बी. व्ही. नागरत्ना आणि न्या. उज्ज्वल भुईया यांच्या खंडपीठाने एका प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान स्पष्ट केले की, हा केवळ अजन्म बाळाचा प्रश्न नसून संबंधित मुलीच्या इच्छेचा आणि तिच्या आयुष्याच्या अधिकाराचा प्रश्न आहे. जर महिलेला किंवा मुलीला बाळाला जन्म द्यायचा नसेल तर तिला जबरदस्तीने प्रसूतीसाठी भाग पाडता येणार नाही. सुनावणीदरम्यान केंद्र सरकारतर्फे उपस्थित विधी अधिकाऱ्यांनी वैद्यकीय अहवालाचा दाखला देत, या टप्प्यावर गर्भपात करणे आई आणि गर्भातील बाळ दोघांसाठीही धोकादायक ठरू शकते.

# २५ वर्षांनंतर दक्षिण कोरियात होंडाची कार विक्री थांबणार

सेऊल

**दक्षिण** कोरियातील वाहन बाजारात मोठा बदल होणार आहे. जपानमधील प्रसिद्ध वाहन निर्माता कंपनी होंडाने तब्बल २५ वर्षे कार विक्री २०२६ च्या अखेरपर्यंत नवीन कार विक्री बंद करण्याचा निर्णय घेतला. वाढती स्पर्धा, बदलती ग्राहक पसंती आणि विद्युत वाहनांच्या वाढत्या मागणीच्या पार्श्वभूमीवर कंपनीने हा निर्णय घेतल्याची माहिती आहे.

होंडाने २००१ साली दक्षिण कोरियाच्या बाजारपेठेत प्रवेश केला होता. सुरुवातीच्या काळात कंपनीच्या गाड्यांना ग्राहकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. आकर्षक रचना, टिकाऊपणा, विश्वासार्ह कामगिरी आणि आरामदायी प्रवास यामुळे होंडाच्या गाड्यांनी ग्राहकांची पसंती मिळवली होती. काही वर्षांतच कंपनीने स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले.२००८ साली होंडाने दक्षिण कोरियामध्ये मोठा टप्पा गाठला होता. एका वर्षात दहा हजार गाड्यांची विक्री करणारा तो पहिला वाहन ब्रँड ठरला होता.

मात्र गेल्या काही वर्षांत वाहन बाजारात बदल झाले. पेट्रोल आणि डिझेल गाड्यांपेक्षा विद्युत वाहनांची मागणी झपाट्याने वाढू लागली. स्थानिक कंपन्यांनीही आधुनिक तंत्रज्ञानासह नवीन गाड्या बाजारात आणल्या. त्याचबरोबर चीन आणि अमेरिकेतील काही कंपन्यांनी दक्षिण कोरियामध्ये जोरदार स्पर्धा निर्माण केली. या वाढत्या स्पर्धेचा परिणाम होंडाच्या विक्रीवर झाला.गेल्या वर्षी कंपनीच्या विक्रीत सुमारे २२ टक्क्यांनी घट झाल्याची माहिती आहे. ग्राहकांची बदलती पसंती, वाढती स्पर्धा आणि नव्या तंत्रज्ञानाच्या वाहनांकडे वळणारा बाजार यामुळे कंपनीने आपली रणनीती बदलण्याचा निर्णय घेतला.

होंडाने स्पष्ट केले आहे की, कार विक्री बंद केली जाणार असली तरी विद्यमान ग्राहकांसाठी सेवा सुरू राहतील. गाड्यांची दुरुस्ती, सुटे भाग, देखभाल आणि हमीशी संबंधित सुविधा पुढेही उपलब्ध राहतील. त्यामुळे आधीच होंडाची कार वापरणाऱ्या ग्राहकांना अडचण येणार नाही.

# मोजतबा खामेनींना कृत्रिम पाय लागणार? इराण लष्कराच्या हाती

तेहरान

**इराणचे** सर्वोच्च नेते मोजतबा खामेनी गंभीर जखमी असल्याची चर्चा आंतरराष्ट्रीय स्तरावर सुरु आहे. त्यांच्या एका पायावर अनेक शस्त्रक्रिया झाल्यानंतर कृत्रिम पाय बसवावा लागू शकतो, चेहरा आणि ओठांवरील भाजल्याच्या जखमांमुळे प्लास्टिक सर्जरीची गरज भासणार असल्याची माहिती आहे. त्यांच्या प्रकृतीमुळे इराणची सूत्रे लष्करी अधिकाऱ्यांच्या हाती असल्याचीही चर्चा आहे. मात्र या सर्व दाव्यांना अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. इराणमधील प्रत्यक्ष सत्ताकारणात लष्कराचा प्रभाव वाढल्याचीही चर्चा आहे. इस्लामिक क्रांती रक्षक दलाशी संबंधित वरिष्ठ अधिकारी सुरक्षा, परराष्ट्र धोरण, युद्धनीती आणि अमेरिकेशी संबंध या विषयांवर महत्त्वाचे निर्णय घेत आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी होर्मुज सामुद्रधुनीत सुरुंग टाकणाऱ्या लहान जहाजांना नष्ट करण्याचे सैन्याला आदेश दिल्याची माहिती आहे. दरम्यान, १० भारतीय जहाजे सुरक्षित बाहेर पडली आहेत. तर १४ जहाजे अजूनही फारसच्या आखातात अडकलेली आहेत. दुसरीकडे, इराणचे निर्वासित युवराज रेजा पहलवी यांच्यावर बर्लिनमध्ये निदर्शकांनी लाल रंग फेकला. अमेरिकन सिनेटमध्ये ट्रम्प यांच्या युद्धसंबंधी अधिकारांवर मर्यादा आणण्याचा प्रस्तावही ५१ विरुद्ध ४६ मतांनी फेटाळण्यात आला.

# केईएम रुग्णालयात रुग्णाची आत्महत्या

**मुंबई-** केईएम रुग्णालयात आज दुपारी सुमारे १ वाजण्याच्या सुमारास २५ वर्षीय तरुणाने रुग्णालयातच गळफास लावून आत्महत्या केली. संबंधित तरुणावर गेल्या महिनाभरापासून रक्ताच्या कर्करोगावर उपचार सुरू होते. त्याला रुग्णालयाच्या हेमेटोलॉजी विभागात दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान त्याच्या प्रकृतीत काही प्रमाणात सुधारणा होत असल्याने लवकरच डिस्चार्ज देण्याची तयारी सुरू होती. मात्र, दुपारी अचानक त्याने रुग्ण पाईपला गळफास लावून आत्महत्या केल्याचे उघड झाले. ही घटना उघड होताच रुग्णालय प्रशासनात एकच खळबळ उडाली.

# बीड कारागृह कराडच्या जीवावर सनी आठवलेची क्लिप व्हायरल

बीड

**बीड** जिल्हा मध्यवर्ती कारागृह कथित गैरप्रकारांमुळे आधीच वादात असताना आणखी एक ऑडिओ क्लिप व्हायरल झाल्याने खळबळ उडाली आहे. या क्लिपमध्ये गुन्हेगार पार्श्वभूमी असलेल्या सनी आठवले याने कारागृहातील व्यवस्थापनाबाबत गंभीर आरोप केले आहेत. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मिक कराडच्या जीवावर कारागृह चालते, असा गंभीर आरोप या क्लिपमध्ये करण्यात आला आहे.

व्हायरल झालेल्या कॉल रेकॉर्डिंगमध्ये सनी आठवले याने असा दावा केला की, कारागृहात वाल्मिक कराडचा प्रचंड दबदबा आहे. तो अझहर पठाण या कैद्यावर सतत दबाव टाकत असून, त्याला अमानुष मारहाण करत आहे. एका कैद्याला मारहाण करून जबाब बदलण्यासाठी दबाव टाकला जात आहे. त्याच्या गँगला कारागृहात डिश टीव्हीसह विविध व्हीआयपी सुविधा पुरवल्या जात आहे. कराडकडे सिम कार्ड, आर्थिक व्यवहार आणि काही अधिकाऱ्यांशी संबंधित माहिती आहे.


।। अविश्रमो लोकतंत्राधिकारा।।

KMC

## खोपोली नगरपरिषद

खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड, पिनकोड नं. ४१०२०३.
फोन नं. (०२१९२) २६२२२२, २६३३५६, २६४२११

जा.क्र.केएमसी/बांधकाम/३४२ दिनांक : २३/०४/२०२६

### बांधकाम विभाग

### खुली ई- निविदा सुचना क्र.८ सन २०२६-२०२७

खोपोली नगरपरिषदेच्या बांधकाम विभागकडील खुली ई-निविदा सुचना क्र. ८ मधील कामासाठी नोंदणीकृत शासन मान्यताप्राप्त अधिकृत कंपनीकडून/ संस्थेकडुन द्विलीफाफा पध्दतीने खुली ई- निविदा मागविण्यांत येत आहेत. सविस्तर ई-निविदा सुचना www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २५/०४/२०२६ पासुन उपलब्ध होईल. सदर कामाच्या निविदा प्रक्रियेत कोणताही बदल/सुधारणा असल्यास वरील संकेत स्थळावर प्रसिध्द करणेंत येईल.

सही/-
मुख्याधिकारी
खोपोली नगरपरिषद

TENDER NOTICE
NEW VASUNDHARA CHSL
Situated At Jamuna Nagar, Opp. Diwanman Talao, Vasai Road, (West) - 401 202.

Sealed Item Rate Tender are Invited for Repair and Painting Work
Tenders can be collected from consultant office
From: 25/04/2026 upto 01/05/2026
Between 11.00 Am To 5.00 Pm
Date of Submission up to
02/05/2026 (up to 5.00 PM)
at NEW VASUNDHARA CHSL Society Office.
(Refer Address from above)
Note: Only Sealed Tender Package will be accepted

STAR ASSOCIATES PMC PVT.LTD.
Vision Yours, Execution Ours.

Office Address - B.O.Shop No.2, Bldg.No.6, A-Wing, Green Park, Near Gokul Village, Mira Road (East) Tel. Office. 9820818155
Tender Cost Rs. 3,000/-
(Non-Refundable)

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई-निविदा सुचना क्र. १७/२०२६ साठी शुद्धीपत्रक

दिनांक १८/०४/२०२६ रोजी दै. नवाकाळ, मुंबई वृत्तपत्रात प्रसिद्ध निविदा सुचना क्र. १७ सन २०२६ अंतर्गत शिर्डी औद्योगिक क्षेत्रातील कामाची निविदा याद्वारे रद्द करण्यात येत आहे..

## ई-निविदा सुचना

मराविमं सूत्रधारी कंपनी मर्यादित

मुख्य अभियंता (स्था), एमएसईबीएचसीएल, मुंबई ई- निविदा क्र. CEC/MSEBHCL/MUM/TECH/T-03, T-04, T-05 आणि CEC / MSEBHCL / MUM / TECH /T-06-2026-27 ला आमंत्रित करत आहेत. बिड कागदपत्रे २५.०४.२०२६ पासुन वेबसाइटवर उपलब्ध होतील. अधिक तपशीलासाठी आणि अद्यतनांसाठी आमच्या वेबसाइट www.mahadiscom.in, ई-निविदा दुव्यास https://etender.mahadiscom.in ला भेट द्या. फोन नं. ०२२-२२६०८३८३
HO PR No. 103/26-27 Dt.24.04.2026

मुख्य अभियंता (स्थापत्य)

## जाहीर सूचना

सदर सूचना देण्यात येत आहे की, श्रीमती आशा प्रकाश मांडविया यांच्या शिर्षकाची आम्ही चौकशी करीत आहोत, सदर मालमत्ता म्हणजे फ्लॅट क्र. ८०३, ८ वा मजला, खंडेलवाल फ्रेंड्स कोहौसो लि. या नावाने ज्ञात इमारत, जी गाव बांद्रा येथील सीटीएस क्र.ई-६७ आणि ई-६८ असलेल्या जमिनीवर बांधकामित असून प्लॉट क्र.४८५/४८६, १७ वा रस्ता, खार (पश्चिम), मुंबई – ४०००५२ येथे स्थित, तसेच सदर सोसायटीचे प्रत्येकी रु.५०/- किमतीचे १० शेअर्स, शेअर क्र.२८१ ते २९० (दोन्ही समाविष्ट), प्रमाणपत्र क्र.२९ दिनांक २४.०८.२०२२ अंतर्गत, सदर मालमत्ता दिवंगत श्री. प्रकाश प्रभुदास मांडविया यांचे कायदेशीर वारस म्हणून यांनी मिळवलेली असून इतर कायदेशीर वारसांनी त्यांच्या हक्कांचा त्याग केलेला आहे.

वरील नमूद केलेल्या सदर प्रिमायसेसबाबत किंवा त्यातील कोणत्याही भागाबाबत विक्री, अदलाबदल, गहाण, प्रभार, भेट, देखभाल, वारसा, ताबा, भाडेपट्टा, वहिवाट, धारणाधिकार, परवाना, हायपोथेकशन, शिर्षक हस्तांतरण किंवा कोणत्याही ट्रस्ट अंतर्गत लाभदायक हक्क, प्रिस्क्रिप्शनचा हक्क, प्री-एम्पशनचा हक्क किंवा कोणत्याही करारानुसार किंवा इतर कोणत्याही प्रकारच्या व्यवहारानुसार अथवा कोणत्याही हुकूम, आदेश, निकाल किंवा अन्य कोणत्याही प्रकारे दावा करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने त्यांचा दावा लेखी स्वरूपात तसेच त्यास समर्थन करणाऱ्या कागदपत्रांसह खाली सही करणाऱ्यांकडे त्यांच्या कार्यालय ३१०, साई चेंबर्स, सांताक्रूझ रेल्वे स्थानक जवळ पूर्व, मुंबई – ४०००५५ येथे या प्रसिद्धीच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत (दोन्ही दिवस समाविष्ट) कळवावा, अन्यथा, अशा व्यक्तींचा दावा त्यांनी सोडून दिलेला आणि/किंवा त्याग केलेला मानण्यात येईल.

**दिनांक २५ एप्रिल २०२६ रोजी**
**मे. एके लिगल पार्टनर्स, वकील**

## ई-निविदा प्रथम मुदतवाढ सूचना

महावितरण

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विभागीय कार्यालय सांगली शहर अंतर्गत उच्चदाब वाहिनी, लघुदाब वाहिनी व रोहीत्र प्रतिबंधात्मक देखभाल व दुरुस्ती कामासाठी निविदा मागविण्यात आली होती. सदर निविदा करारासाठी मान्यता प्राप्त नामांकित परवानाधारक विद्युत ठेकेदारांसाठी ई-निवीदा खालील प्रमाणे महावितरण कंपनीच्या संकेत स्थळावर https://etender.mahadiscom.in/eatApp/ दि. ११.०४.२०२६. वेळ ००.०० पासुन उपलब्ध करून देण्यात आली होती. सदर ई निविदा भरणेची अंतिम मुदत दि. २९.०४.२०२६ वेळ २३.५५ वाजेपर्यंत वाढविणेत आली आहे.

| अ. क्र. | निविदा क्र. | निविदा रक्कम रु. (लक्ष) | बयाना रक्कम |
|---|---|---|---|
| १ | EE/SGLU/T/PM/ LT HT & DTC/T-01/2026-27 | रु. ४८ लक्ष | रु. ४८०००/- |

मोबाईल क्र – ७८७५७६९४७१

सही/-
PRO/KOPZ/२९/२०२६–२७ कार्यकारी अभियंता सांगली शहर विभाग

## ई-निविदा सूचना

महावितरण

महावितरण कंपनीच्या नोंदणीकृत ठेकेदारांकडून रत्नागिरी मंडल कार्यालयांतर्गत रत्नागिरी, चिपळूण आणि खेड विभागामध्ये ८ Rmt / २०० kg सिमेंट पोल भरणे, उतरणे व वाहतुकीसह पुरविण्या करिता निविदा मागविण्यांत येत आहे.

| अ. क्र. | निविदा क्र. | विभाग | निविदा रक्कम (रु. लाखात) | बयाणा रक्कम (रु.) | निविदा खरेदी फी (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | SE/RC/T/PSC Pole /T-07/2026-27 | रत्नागिरी/चिपळूण/ खेड | २०.०० | २००००/- | २५००+ १८% GST = २९५०/- |

निविदा खरेदी फी ऑन लाईन भरणे आवश्यक आहे व बयाणा रक्कम बँक गॅरंटी, डीडी स्वरूपात (पेऐबल ॲट रत्नागिरी ) अथवा ऑनलाईन भरणे आवश्यक आहे. निविदा दिनांक २५.०४.२०२६ पासून कंपनीच्या https://etender.mahadiscom.in/eatApp या वेबसाईटवर उपलब्ध आहेत.

निविदा दाखल करण्याची अंतिम तारीख : ०४.०५.२०२६ up to २३.५५ Hrs.
तांत्रिक बोली उघडण्याची तारीख : ०५.०५.२०२६ at ११.०० Hrs. (if possible)
प्री बिड मिंटींग : २८.०४.२०२६ at १२.०० Hrs.

सही/-
PRO/KZR/No. १७/२०२६–२७ दि. २४.०४.२०२६ अधीक्षक अभियंता (रमं), मंडल कार्यालय, रत्नागिरी

## फॉर्म ए
## जाहीर उद्घोषणा

(भारतीय नादारी आणि दिवाळखोरीपणा मंडळ (ऐच्छिक परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१७ च्या विनियमन १४ अन्वये)

मार्शल शिप मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेडच्या भागधारकांचे लक्ष वेधण्याकरिता

| | | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट व्यक्तीचे नाव | मार्शल शिप मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेड |
| २. | कॉर्पोरेट व्यक्तीच्या स्थापनेचा दिनांक | २९ डिसेंबर, २०२२ |
| ३. | प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट व्यक्तीची स्थापना/नोंदणीकरण झाले | कंपनी निबंधक - मुंबई |
| ४. | कॉर्पोरेट व्यक्तीचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक / मर्यादित दायित्व ओळख क्रमांक | U74910MH2019PTC334992 |
| ५. | कॉर्पोरेट व्यक्तीच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता | डी विंग, ६ वा मजला, युनिट ६०५, ६०६, ६०७, टाईम स्क्वेअर अंधेरी (पू), मुंबई ४०००५९. |
| ६. | कॉर्पोरेट व्यक्तीचे परिसमापन सुरु होण्याचा दिनांक | २३ एप्रिल, २०२६ |
| ७. | परिसमापकाचे नाव, पत्ता, ईमेल पत्ता, दूरध्वनी क्रमांक आणि नोंदणीकरण क्रमांक | मे. वॉटरफॉल इनसॉल्व्हन्सी प्रोफेशनल प्रायव्हेट लिमिटेड आयबीबीआय नोंद.: IBBI/IPE-0022/IPA-1/2022-23/50016 नियुक्त संचालक: श्री. अविनाश अंबिकाप्रसाद शुक्ला आयबीबीआय नोंद.: IBBI/IPA-003/IP-N00243/2019-2020/12839 |
| ८. | दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक | २३ मे, २०२६ |

याद्वारे सूचना देण्यात येते की, मार्शल शिप मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेडने दि. २३ एप्रिल, २०२६ रोजी ऐच्छिक परिसमापन सुरु केले आहे.
मार्शल शिप मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेडच्या भागधारकांना याद्वारे त्यांच्या दाव्यांचे पुरावे दि. २३ मे, २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी परिसमापक यांच्याकडे नोंद क्र. ७ मध्ये नमूद पत्त्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे.
वित्तीय धनको यांनी दाव्याबाबतचे त्यांचे दाव्यांचे पुरावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. इतर सर्व भागधारक त्यांचे दाव्यांचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करू शकतात.
दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.

दिनांक: २५.०४.२०२६
ठिकाण: मुंबई

सही/-
अविनाश अंबिकाप्रसाद शुक्ला
नियुक्त संचालक
मे. वॉटरफॉल इनसॉल्व्हन्सी प्रोफेशनल प्रायव्हेट लिमिटेडचा
आयबीबीआय नोंदणी क्र. - IBBI/IPA-003/IP-N00243/2019-2020/12839
एएफए क्र. : AA3/12839/02/300626/301298 वैधता दि. ३०.०६.२०२६ पर्यंत
आयबीबीआय नोंदणी - IBBI/IPE-0022/IPA-1/2022-23/50016
एएफए : AA1/50016/02/311226/20083 वैधता दि. ३१.१२.२०२६ पर्यंत
मार्शल शिप मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेड - ऐच्छिक परिसमापनाअंतर्गत च्या प्रकरणात परिसमापक

## पुणे महानगरपालिका, पुणे

पुणे महानगरपालिका

निविदा प्रक्रिया कक्ष आपत्ती व्यवस्थापन विभाग
निविदा जाहिरात - (फेर निविदा)

विक्री कालावधी दिनांक:- २७/०४/२०२६ ते ०४/०५/२०२६ दुपारी १४:३० पर्यंत
वीकृती दिनांक:- २७/०४/२०२६ ते ०४/०५/२०२६ दुपारी १४:३० पर्यंत
तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक:- ०५/०५/२०२६ दुपारी १५:००

| निविदा क्र. | खात्याचे नाव | कामाचे नाव | निविदा संच किंमत रक्कम रु. | अंदाजित पूर्व गणित रक्कम रु. | बयाणा रक्कम रु. (१%) | कामाची मुदत (महिने) | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २/२०२५ -२६ | आपत्ती व्यवस्थापन विभाग | राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (NDMA) अर्बन फ्लड रिस्क मिटीगेशन प्रोग्राम अंतर्गत पुणे महानगरपालिकेमार्फत पूर्व तयारी व क्षमता बांधणी करणे | ६,०७९/- | ९९,८९,०००/- | ९९,८९०/- | ५ महिने | प्रतिक शिरोळे ९६६५०३२८७२ |

अ) सदर कामाबाबत निविदा अटी / शर्ती इ. बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामाचे निविदा www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्वीकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकीट पद्धतीने मागविण्यात येत आहेत.
ब) निविदा प्रक्रियाच्या शेवटच्या दिवशी संच प्राप्त न झाल्यास व स्वीकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाईन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्व जबाबदारी टेंडरदाराची राहील.
क) ऑनलाईन निविदा प्रकिया बाबतची संपूर्ण माहिती टेंडर सेल विभाग, पुणे महानगरपालिका येथे मिळेल.

सही/-
(गणेश सोनुने)
आपत्ती व्यवस्थापन अधिकारी (वर्ग -१)
पुणे महानगरपालिका

जाहिरात क्र. २/५७ दि. २४/०४/२०२६

## फॉर्म बी
## जाहीर उद्घोषणा

(भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६ चे विनियमन १२)

क्वालिटी केअर डायलिसिस प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये) च्या भागधारकांचे लक्ष वेधण्याकरिता

| अ. क्र. | तपशील | वर्णन |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव | क्वालिटी केअर डायलिसिस प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये) |
| २. | कॉर्पोरेट ऋणकोच्या स्थापनेचा दिनांक | ३ जून, २०११ |
| ३. | प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना/नोंदणीकरण झाले | आरओसी - मुंबई |
| ४. | कॉर्पोरेट ऋणकोचा कॉर्पोरेट ओळख क्र./ मर्यादित दायित्व ओळख क्रमांक | U74900MH2011PTC218288 |
| ५. | कॉर्पोरेट ऋणकोच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा पत्ता | २३ रेनबो, सी एस टी रोड, विद्यानगरी, मुंबई, महाराष्ट्र, भारत - ४०००९८. |
| ६. | दिवाळखोरी ठराव प्रक्रिया परिसमाप्तीचा दिनांक | २१ एप्रिल, २०२६ |
| ७. | कॉर्पोरेट ऋणकोचे परिसमापन सुरु होण्याचा दिनांक | २१ एप्रिल, २०२६ |
| ८ | परिसमापक म्हणून काम करणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण पत्ता | केडीआरए इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनल्स प्रायव्हेट लिमिटेड IBBI/IPE-0059/IPA-1/2022-23/50037 |
| ९ | मंडळाकडे नोंदणीकृत असलेला परिसमापकाचा पत्ता आणि ई-मेल | केडीआरए इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनल्स प्रायव्हेट लिमिटेड, युनिट क्र. १६०१, चांडक युनिकॉर्न, दत्ताजी साळवे मार्ग, ऑफ वीरा देसाई रोड, अंधेरी पश्चिम, मुंबई - ४०००५३. irp@kdraip.com |
| १० | परिसमापकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ई-मेल | केडीआरए इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनल्स प्रायव्हेट लिमिटेड, युनिट क्र. १६०१, चांडक युनिकॉर्न, दत्ताजी साळवे मार्ग, ऑफ वीरा देसाई रोड, अंधेरी पश्चिम, मुंबई - ४०००५३. liquidationquality@gmail.com |
| ११ | दावा सादर करण्याचा अंतिम दिनांक | २१ मे, २०२६ |

याद्वारे सूचना देण्यात येते की, माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांनी दि. २१ एप्रिल २०२६ रोजी मे. क्वालिटी केअर डायलिसिस प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये)चे परिसमापन सुरु करण्याचे आदेश दिले आहेत. (संकेताच्या कलम ३३ अन्वये परिसमापन आदेश पारित करण्याचा दिनांक (आदेश दिनांक २१ एप्रिल, २०२६)
मे. क्वालिटी केअर डायलिसिस प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये) च्या भागधारकांना याद्वारे त्यांचे दावे दि. २१ मे, २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी परिसमापकाकडे बाब क्र. १० समोर नमूद पत्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे.
वित्तीय धनको यांनी दाव्याबाबतचे त्यांचे पुरावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. इतर सर्व भागधारक त्यांचे दाव्याबाबतचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करू शकतात.
दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.
जर भागधारकाने त्यांचे दावे परिसमापन प्रक्रियेदरम्यान सादर न केल्यास, भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तीकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ अन्वये कॉर्पोरेट दिवाळखोरी ठराव प्रक्रियेदरम्यान अशा भागधारकाद्वारे सादर केलेले दावे, कलम ३८ अन्वये सादर करण्यात आल्याचे मानले जाईल.

दिनांक: २५ एप्रिल, २०२६
ठिकाण: मुंबई

सही/-
केडीआरए इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनल्स प्रायव्हेट लिमिटेड
परिसमापक
क्वालिटी केअर डायलिसिस प्रायव्हेट लिमिटेड
आयबीबीआय नोंदणी क्र.: IBBI/IPE-0059/IPA-1/2022-23/50037
एएफए वैधता दिनांक - ३१ डिसेंबर, २०२६

मुंबई । शनिवार
२५ एप्रिल, २०२६

नवाकाळ

Email- contact@navakal.in
24x7 : www.navakal.in



# अनुराग बासूंची स्पष्टोक्ती



दिग्दर्शक अनुराग बासू यांच्या बहुचर्चित संगीतमय प्रेमपटाबाबत सध्या चित्रपटसृष्टीत तर्कवितर्कांना उधाण आले असतानाच, या चित्रपटाच्या चित्रीकरणाबाबत बासू यांनी महत्त्वाची स्पष्टोक्ती दिली आहे. अभिनेता कार्तिक आर्यन आणि अभिनेत्री श्रीलीला यांची मुख्य भूमिका असलेल्या या चित्रपटाचे बहुतांश चित्रीकरण पूर्ण झाल्याच्या बातम्या निव्वळ अफवा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.


एका मुलाखतीत अनुराग बासू यांनी नमूद केले की, या चित्रपटाचे चित्रीकरण अद्याप सुरुवातीच्या टप्प्यात आहे. मी या चित्रपटासाठी केवळ ४५ दिवस चित्रीकरण केले असून, कामाला खरी सुरुवात आता कुठे होत आहे, असे बासू यांनी स्पष्टपणे सांगितले. सुरुवातीला या चित्रपटाची चर्चा 'आशिकी' या गाजलेल्या मालिकेचा भाग म्हणून होत होती. मात्र, कायदेशीर आणि तांत्रिक पेचप्रसंगामुळे आता हा चित्रपट एक स्वतंत्र कलाकृती म्हणून आकाराला येत आहे. फेब्रुवारी २०२४ मध्ये या चित्रपटाची पहिली झलक समोर आली होती आणि डिसेंबर २०२५ पर्यंत तो प्रदर्शित होईल, अशी अपेक्षा होती. मात्र, विविध कारणांमुळे या प्रकल्पाला विलंब झाला असून, आता हा चित्रपट २०२६ च्या अखेरीस किंवा २०२७ च्या सुरुवातीला प्रेक्षकांच्या भेटीला येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. या मुलाखतीदरम्यान बासू यांनी मला किशोर कुमार यांच्यावरील चित्रपटावर लक्ष केंद्रित करायचे असल्याचेही सांगितले.



# 'मायकेल'ची तुफानी सलामी

पॉप सम्राट मायकेल जॅक्सन याच्या जीवनावर आधारित 'मायकेल' या हॉलिवूडपटाने भारतीय बॉक्स ऑफिसवर प्रदर्शनापूर्वीच जोरदार सलामी दिली आहे. या चित्रपटाच्या पहिल्या आठवड्याच्या आगाऊ तिकीट विक्रीने १ लाखांचा टप्पा ओलांडला असून, केवळ 'पेड प्रिव्ह्यू'च्या माध्यमातूनच १ कोटी रुपयांहून अधिक कमाई होण्याचे संकेत मिळत आहेत. हैदराबादमध्ये या चित्रपटाला अभूतपूर्व प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र आहे. तेथील प्रसिद्ध प्रसाद मल्टिप्लेक्समध्ये एकट्या पहिल्या आठवड्यासाठी ७,३०० तिकिटांची विक्री झाली आहे. पाश्चिमात्य देशांतील काही नकारात्मक समीक्षणांनंतरही भारतातील चाहत्यांमध्ये या चित्रपटाबाबतची क्रेझ कमी झालेली नाही हे विशेष म्हणावे लागेल.






# राकेश बेदींना एक कोटी 'बोनस'



'धुरंधर' (२०२५) आणि 'धुरंधर द रिव्हेंज' (२०२६) या चित्रपटांच्या ऐतिहासिक यशानंतर, या मालिकेतील जमील जमाली ही भूमिका साकारणाऱ्या राकेश बेदी यांच्यावर निर्मात्यांनी बक्षिसाचा वर्षाव केला आहे. त्यांच्या कामावर खूश होऊन निर्मात्यांनी त्यांना मानधनाव्यतिरिक्त १ कोटी रुपयांचा विशेष बोनस दिला असल्याची माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अभिनेता रणवीर सिंगची मुख्य भूमिका असलेल्या या चित्रपटात राकेश बेदी यांनी जमील जमाली या पाकिस्तानी राजकारण्याची भूमिका अत्यंत प्रभावीपणे साकारली होती. त्यांचे संवाद समाजमाध्यमांवर प्रचंड गाजले असून त्यांच्या पात्रावर आधारित अनेक 'मीम्स' सध्या फिरत आहेत. या भूमिकेसाठी राकेश बेदी यांनी घेतलेली मेहनत आणि प्रेक्षकांकडून मिळणारे प्रेम पाहून निर्माते भारावून गेले. मूळ कराराप्रमाणे त्यांना दोन्ही भागांसाठी ५० लाख रुपये मानधन देण्यात आले होते. मात्र चित्रपटाच्या अभूतपूर्व यशानंतर दिग्दर्शक आदित्य धर आणि लोकेश धर यांनी त्यांना मानधनाच्या दुप्पट रुपयांचा अतिरिक्त धनादेश देऊन गौरवले. सिनेसृष्टीत अशा प्रकारे मानधनापेक्षा जास्त रक्कम बोनस म्हणून देण्याचे प्रकार तसे दुर्मीळ मानले जातात. त्यामुळे आदित्य धरच्या या दिलदारपणाचेही सर्वत्र कौतुक होत आहे.

# तब्बल १५ वर्षांनंतर



अभिनेता अक्षय कुमार आणि दिग्दर्शक अनीस बज्मी यांची जोडी तब्बल १५ वर्षांनंतर पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर एकत्र येत असून, या आगामी चित्रपटाच्या पुढील चित्रीकरणासाठी अक्षय कुमार आणि अभिनेत्री विद्या बालन केरळला रवाना झाले आहेत. अक्षयने स्वत: सोशल मीडियाच्या माध्यमातून ही माहिती देताना 'गॉडस् ओन कंट्री' म्हणजेच केरळमधील निसर्गरम्य ठिकाणी चित्रीकरण सुरू करत असल्याचे सांगितले. आपल्या प्रवासातील एक चित्रफित सामायिक करताना अक्षयने लिहिले की, पुढचा मुक्काम: जादूई केरळ. अनीस बज्मी यांच्या या चित्रपटाच्या निमित्ताने मी चौथ्यांदा विद्या बालनसोबत काम करत आहे. आमच्या जोडीचे हे नशीब यापुढेही असेच कायम राहील, अशी मला आशा आहे. अक्षय आणि अनीस बज्मी यांनी यापूर्वी २०११ मध्ये 'थँक्यू' या चित्रपटासाठी एकत्र काम केले होते.

# 'वाराणसी'ची जागतिक झलक

दिग्दर्शक एस. एस. राजामौली यांच्या आगामी 'वाराणसी' या अॅक्शन-अॅडव्हेंचर चित्रपटाची जागतिक स्तरावर पहिली मोठी झलक 'कॉमिक कॉन एक्सपिरियन्स मेक्सिको २०२६' मध्ये पाहायला मिळणार आहे. २०२७ मध्ये प्रदर्शित होणाऱ्या या चित्रपटाच्या आंतरराष्ट्रीय प्रसिद्धीच्या प्रवासातील हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. या सोहळ्यात २४ एप्रिल रोजी थंडर स्टेजवर निर्माते एस. एस. कार्तिकेय 'वाराणसी टू द वर्ल्ड' हा विशेष विभाग सादर करणार आहेत. यामध्ये राजामौली यांचा एक खास व्हिडिओ संदेश आणि यापूर्वी कधीही न पाहिलेले चित्रपटाच्या चित्रीकरणाचे (बिहाईंड द सीन्स) चित्रण दाखवले जाईल. या सत्राचा समारोप थेट संवादाने होईल, ज्यातून प्रेक्षकांना या भव्य प्रकल्पाची व्याप्ती आणि त्यामागील दूरदृष्टी जवळून अनुभवता येईल. अभिनेता महेश बाबू, प्रियांका चोप्रा जोनास आणि पृथ्वीराज सुकुमारन यांची मुख्य भूमिका असलेला हा चित्रपट सध्या भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वात अपेक्षित प्रकल्पांपैकी एक आहे. मेक्सिकोमधील या सादरीकरणामुळे जागतिक प्रेक्षकांमध्ये या चित्रपटाची अधिक चर्चा होण्याची शक्यता आहे. यापूर्वी युरोपमधील ले ग्रँड रेक्स येथील ट्रेलर महोत्सवात या चित्रपटाच्या पहिल्या झलकला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला होता. हा चित्रपट ७ एप्रिल २०२७ रोजी जगभरातील चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे.

# कार्तिक-अमीन पहिल्यांदाच एकत्र



बहुप्रतीक्षित 'कॅप्टन इंडिया' या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख अखेर निश्चित झाली असून, अभिनेता कार्तिक आर्यन आता वैमानिकाच्या भूमिकेत मोठ्या पडद्यावर झळकण्यासाठी सज्ज झाला आहे. दिग्दर्शक शिमीत अमीन आणि कार्तिक आर्यन यांची ही युती असलेला हा पहिलाच चित्रपट १३ ऑगस्ट २०२७ रोजी प्रदर्शित होणार आहे. स्वातंत्र्यदिनाच्या मुहूर्तावर हा चित्रपट प्रदर्शित करून प्रेक्षकांना देशभक्तीपर थराराची मेजवानी देण्याचे निर्मात्यांनी ठरवले आहे. टी-सीरिज, बावेजा स्टुडिओ आणि मिडनाईट चाय फिल्म्स यांची निर्मिती असलेला हा चित्रपट २०२१ मध्ये पहिल्यांदा चर्चेत आला होता. मात्र, मधल्या काळात या प्रकल्पात अनेक बदल झाले. या चित्रपटाचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे तब्बल १७ वर्षांनंतर दिग्दर्शक शिमीत अमीन यांचे पुनरागमन. 'चक दे इंडिया', 'अब तक छप्पन' आणि 'रॉकेट सिंग: सेल्समन ऑफ द इयर' यांसारख्या वेगळ्या धाटणीच्या चित्रपटांसाठी ओळखले जाणारे अमीन या मोठ्या पटाचे दिग्दर्शन करत आहेत. यापूर्वी या चित्रपटासाठी हंसल मेहता यांच्या नावाची चर्चा होती, मात्र आता शिमीत अमीन यांनी ही धुरा सांभाळली आहे. चित्रपटाची पटकथा हरमन बावेजा यांनी लिहिली असून ते या चित्रपटाचे निर्मातेही आहेत.

## नेस्को अमली पदार्थ प्रकरणी दोन पोलिसांवर गुन्हा

■ मुंबई

**गोरेगाव** येथील नेस्को परिसरात झालेल्या एका संगीत कार्यक्रमानंतर उघड झालेल्या अमली पदार्थ प्रकरणाने गंभीर वळण घेतले आहे. कार्यक्रमाच्या नावाखाली अमली पदार्थांची पार्टी झाल्याचा आरोप होत असताना, दोन तरुणांचा मृत्यू झाल्याने प्रकरण अधिकच चिघळले. आता या प्रकरणात दोन पोलिसांवरही गुन्हा दाखल झाल्याने खळबळ उडाली. हा कार्यक्रम उशिरापर्यंत सुरू होता. त्या ठिकाणी मद्यासह अमली पदार्थांचेही मोठ्या प्रमाणावर सेवन झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

## कर्जाचा गैरवापर करणाऱ्या २४ साखर कारखान्यांना दिलासा?

■ मुंबई

**सरकारच्या** हमीवर मिळालेल्या कर्जाचा गैरवापर करणाऱ्या राज्यातील २४ सहकारी साखर कारखान्यांना दिलासा मिळण्याची चिन्हे आहेत. राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाने त्रुटी दाखवूनही संबंधित कारखान्यांना स्वच्छता प्रमाणपत्र देण्याची तयारी सुरू असल्याची माहिती मिळाल्याने आल्याने सहकार क्षेत्रात नव्या वादाला तोंड फुटले आहे.

राज्यातील ३३ सहकारी साखर कारखान्यांना सरकारच्या हमीवर कर्ज देण्यात आले होते. यामध्ये कोल्हापूर, सातारा, सोलापूर, अहिल्यानगर, बीड, लातूर, पुणे, बुलडाणा, जालना आणि सांगली जिल्ह्यातील अनेक प्रमुख कारखान्यांचा समावेश आहे. मात्र या कर्जाचा वापर मंजूर उद्देशासाठी न करता इतर कारणांसाठी केल्याचे राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाच्या तपासणीत आढळले होते. यापैकी केवळ सहा कारखान्यांनी नियमांनुसार कर्जाचा वापर केल्याचे मान्य केले होते. २१ कारखान्यांच्या कर्जवापरात गंभीर त्रुटी आढळल्या.

## कोठडीतील आरोपींसाठी गणवेश मुंबई पोलिसांचा नवा निर्णय

■ मुंबई

**कोठडीत** असलेल्या आरोपींच्या सुरक्षिततेसाठी आणि अनुचित प्रकारांना आळा घालण्यासाठी मुंबई पोलिसांनी महत्त्वाचा निर्णय घेतला. पोलीस कोठडीत ठेवलेल्या आरोपींसाठी आता अधिकृत गणवेश लागू करण्यात आला आहे. त्यामुळे कोठडीत असलेल्या आरोपींना ठराविक पेहरावात राहणे बंधनकारक असणार आहे. नव्या नियमानुसार, मुंबईतील जनरल लॉकअपमध्ये असलेल्या पुरुष आरोपींना मरून रंगाचा टी-शर्ट आणि हाफ पँट देण्यात येत आहे. आरोपीला अटक झाल्यापासून न्यायालयीन कोठडीत रवानगी होईपर्यंत किंवा जामिनावर सुटका होईपर्यंत हा गणवेश घालावा लागणार आहे. सहायक पोलीस आयुक्त सचिन कदम यांनी सांगितले की, यापूर्वी काही आरोपींनी स्वतःच्या कपड्यांतील नाडी, बेल्ट, शर्ट किंवा पँटचा वापर करून आत्महत्येचा प्रयत्न केल्याच्या घटना घडल्या आहेत.

## क्लॉड मिथॉस एआयमुळे सायबर हल्ल्याचा धोका

### अर्थमंत्र्यांनी बँक प्रमुखांना सतर्क केले

■ नवी दिल्ली

**अर्थमंत्री** निर्मला सीतारामन यांनी विविध बँकांच्या प्रमुखांसोबत उच्चस्तरीय सुरक्षा बैठक घेतली. या बैठकीत अग्रगण्य अँथ्रोपिक कंपनीच्या 'क्लॉड मिथॉस' या अत्याधुनिक एआय मॉडेलमुळे निर्माण होणाऱ्या सायबर सुरक्षेच्या धोक्यांवर चर्चा करण्यात आली. 'क्लॉड मिथॉस' हे सायबर सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत प्रगत एआय मॉडेल मानले जाते. हे मॉडेल सॉफ्टवेअरमधील त्रुटी अतिशय वेगाने ओळखू शकते. तसेच काही सेकंदांत कोडच्या लाखो ओळी वाचून संभाव्य सायबर हल्ल्यांचे अनुकरण करण्याची क्षमता त्यामध्ये आहे. हे तंत्रज्ञान चुकीच्या व्यक्तींच्या हाती लागल्यास गंभीर सायबर धोका निर्माण होऊ शकतो, अशी चिंता बैठकीत व्यक्त करण्यात आली. त्यामुळे बँकिंग क्षेत्राने सायबर सुरक्षेसाठी अधिक मजबूत उपाययोजना कराव्यात, असे निर्देश अर्थमंत्र्यांनी दिले.

'क्लॉड मिथॉस' हे अँथ्रॉपिक कंपनीचे सर्वात शक्तिशाली एआय मॉडेल असून, त्याच्या क्षमतेमुळे सायबर सुरक्षेबाबत गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे. कंपनीच्या म्हणण्यानुसार, हे मॉडेल इतके प्रभावी आहे की, ते सर्वसामान्यांसाठी उपलब्ध करून देता येणार नाही. 'क्लॉड मिथॉस'ने मानवी तज्ज्ञांच्या लक्षात न आलेल्या हजारो सायबर सुरक्षेतील त्रुटी शोधून काढल्या आहेत. यात प्रमुख ऑपरेटिंग सिस्टिम्स आणि वेब ब्राउझर्समधील तब्बल २७ वर्षांपासून अस्तित्वात असलेल्या त्रुटींचाही समावेश आहे.

## चांगल्या रस्त्यासाठी कोट्यवधींची निविदा पाणजू ग्रामस्थांनी उघडकीस आणला भ्रष्टाचार

■ नायगाव

**पाणजू** बेटावर असलेल्या रस्त्याच्या कामातील भ्रष्टाचार ग्रामस्थांनी उघडकीस आणला आहे. हा रस्ता चांगल्या स्थितीत असूनही त्याच्या मजबुतीकरणाचे सव्वा तीन कोटींचे काम ठेकेदाराला देण्यात आले होते.

या अनावश्यक कामाला ग्रामस्थांनी विरोध केला होता. ग्रामस्थांच्या आक्रमक पावित्र्यानंतर महाराष्ट्र सागरी मंडळाने पूर्ण रस्त्याऐवजी केवळ डागडुजीचे काम करण्याचा निर्णय घेतला आहे. वसई आणि नायगाव खाडीच्या मध्ये पाणजू हे बेट आहे. या बेटाची लोकसंख्या साडेतीन हजार आहे. वसईत येण्यासाठी ग्रामस्थांना बोटीचा वापर करावा लागतो. या बेटापासून रेल्वे रुळापर्यंत येण्यासाठी एक रस्ता आहे.

महाराष्ट्र सागरी मंडळाने (मेरीटाईम बोर्ड) नव्याने या रस्त्याच्या काम हाती घेतले होते. चालू स्थितीतील रस्ता नव्याने बांधण्यात येत असल्याने ग्रामस्थांनी आश्चर्य व्यक्त केले. मात्र या रस्त्याच्या मजबुतीकरणासाठी तब्बल ३ कोटी २१ लाख रुपयांची निविदा काढली होती. डोंबिवलीच्या एका ठेकेदाराला काम देण्यात आले होते. परंतु ग्रामस्थांनी त्याला विरोध केला.

## विधान परिषदेसाठी भाजपाची ३० संभाव्य नावांची यादी

■ मुंबई

**बारामती** व राहुरी पोटनिवडणुकीचे मतदान पार पडल्यानंतर आता विधान परिषदेच्या १० जागांसाठीच्या निवडणुकीच्या हालचालींना वेग आला आहे. भाजपा कोअर कमिटीने एकास पाच या सूत्रानुसार संभाव्य उमेदवारांची यादी तयार करून तब्बल ३० नावे केंद्रीय नेतृत्वाकडे पाठवली आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा निवासस्थानी बुधवारी रात्री झालेल्या कोअर कमिटीच्या बैठकीत उमेदवारांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीत केंद्रीय नेतृत्वाशी चर्चा करून अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार मुख्यमंत्री फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना देण्यात आला. या बैठकीनंतर संभाव्य




उमेदवारांची यादी दिल्लीतील वरिष्ठ नेतृत्वाकडे पाठवण्यात आली आहे. विधान परिषदेच्या पोटनिवडणुकीसाठी प्रज्ञा सातव यांचे नाव जवळपास निश्चित मानले जात आहे. त्यांनी काँग्रेसच्या प्राथमिक सदस्यत्वासह चार महिन्यांपूर्वी आमदारकीचा राजीनामा देत भाजपामध्ये प्रवेश केला आहे. या यादीत डॉ. राजीव पोतदार, संजय केणेकर, सुनील कर्जतकर, माजी आमदार प्रज्ञा सातव, राजा राऊत, प्रशांत परिचारक, राम सातपुते, सुरेश हळवणकर, निलय नाईक, प्रकाश पाटील देवसरकर तसेच माजी मंत्री अनंतराव देशमुख यांचा समावेश आहे. याशिवाय गणेश हाके, नीता केळकर, राजेश पांडे, डॉ. आरती फुसाटे, अतुल काळसेकर, माधव भंडारी, माधवी नाईक, विजय चौधरी, लक्ष्मण सावजी, सुरेश बनकर, अर्चना पाटील चाकूरकर, दयाशंकर तिवारी आदींची नावे आहेत, अशी माहिती आहे.

## महिला-बाल निधीत घोटाळा आदिती तटकरेंचा कारवाईचा इशारा

■ ठाणे

**ठाणे** जिल्ह्यातील महिला व बालविकास विभागांतर्गत जिल्हा नियोजन निधीत झालेल्या ७३ कोटी रुपयांच्या कथित गैरव्यवहार प्रकरणाची माहिती सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी उघड केल्यानंतर या प्रकरणाची चौकशी केली जाणार असून, दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिला आहे.

मावळ तालुक्यातील किवळे येथील एका कार्यक्रमानंतर बोलताना त्यांनी सांगितले की, महिला व बालकांच्या कल्याणासाठी राखीव असलेल्या निधीचा गैरवापर हा अत्यंत गंभीर प्रकार आहे. या प्रकरणाची सरकारने तातडीने दखल घेतली असून सखोल चौकशीसाठी समिती नेमण्यात आली आहे.

समितीचा अहवाल मिळताच संबंधित दोषींवर कायदेशीर आणि कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या प्रकरणात सहभागी असलेल्या कंत्राटदारांना ब्लॅकलिस्टमध्ये टाकण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.

## प्रशांत आंबींना शिवीगाळ प्रकरणी आ.संजय गायकवाडांची दिलगिरी

■ कोल्हापूर

**दिवंगत** कॉम्रेड गोविंद पानसरे यांनी सुमारे ३७ वर्षांपूर्वी 'शिवाजी कोण होता' या लिहिलेल्या पुस्तकाच्या शीर्षकावरून बुलडाणाचे शिंदे सेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी प्रकाशक प्रशांत आंबी यांना फोन करत शिवाजी महाराजांचा एकेरी उल्लेख केल्याचा आरोप करत अर्वाच्च भाषेत शिवीगाळ केली. यामुळे राज्यातील राजकारण तापले. आज गायकवाड यांनी शिवीगाळ केल्याप्रकरणी दिलगिरी व्यक्त करून या वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला.

संजय गायकवाड म्हणाले की, ज्याने कोणी ते पुस्तक प्रकाशन केले आहे त्यांनी फक्त छत्रपती शिवाजी महाराज यांचा सन्मानजनक वापर त्या ठिकाणी करावा. मी त्यांना केलेली शिवीगाळ, त्यांच्या आई व पत्नीबद्दलचे अपशब्द याबाबत मी दिलगिरी व्यक्त करतो. पण ज्यांना बुलडाण्यात किंवा महाराष्ट्रात इतरत्र जाहीर पुस्तक वाचन करायचे आहे असे, त्यांना विनंती आहे की आपण आपल्या बापाचे नाव सुद्धा एकेरी घेत नाही तर महाराजांच्या नावाचा छत्रपती शिवाजी महाराज असाच उल्लेख करून खुशाल पुस्तक वाचा. आम्ही पण तुमचे पुस्तक वाचन ऐकायला येऊ पण महाराजांचा नावाचा एकेरी उल्लेख करून करोडो हिंदूंचा अपमान करू नका.

दरम्यान याप्रकरणी काल पोलिसांनी तुर्तास आमदार असलेल्या संजय गायकवाड यांच्यावर तातडीने गुन्हा नोंदवून घेण्यास नकार दिला. यावर आज राजारामपुरी पोलीस ठाण्यात शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार हे प्रकाशक प्रशांत आंबी यांच्यासोबत गेले होते. यावेळी आंबी यांचे कुटुंब व इतर नागरिकही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### गायकवाडांच्या मुलाचाही शिवीगाळ करतानाचा व्हिडिओ व्हायरल

आमदार संजय गायकवाड प्रकाशक प्रशांत आंबी शिवीगाळ प्रकरणानंतर त्यांचा मुलगा कुणाल गायकवाडचाही शिवीगाळ करतानाचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पराभूत उमेदवारांच्या घराखाली जाऊन कुणाल गायकवाडने गाडीवर उभे राहून अश्लील शिवीगाळ केल्याचे व्हिडिओमध्ये दिसते. बुलडाणा नगर परिषद निवडणुकीनंतर प्रभाग क्रमांक ६ मधील विजयी उमेदवार कुणाल गायकवाड आणि काँग्रेस नेते दत्ता काकस यांच्यातील वादाचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. निकालानंतर काढलेल्या मिरवणुकीत काकस यांच्या घरासमोर फटाके फोडून जल्लोष केला. तसेच गायकवाड यांनी गाडीच्या बोनेटवर चढून शिवीगाळही केली होती.

## मराठीला विरोध करणारे महाराष्ट्राचे शत्रू! राऊतांचा शिंदे सेनेवर आरोप



■ मुंबई

**मराठी** भाषेच्या मुद्यावरून राज्यातील राजकारण पुन्हा तापले आहे. मराठी भाषेला विरोध करणारे हे महाराष्ट्राचे शत्रू असल्याचा घणाघात उबाठा खासदार संजय राऊत यांनी शिंदे सेनेवर केला.

संजय राऊत म्हणाले की, मंत्री प्रताप सरनाईक यांनी मराठीबाबत घेतलेली भूमिका ही महाराष्ट्राच्या हिताची आहे. मात्र त्यांच्या भूमिकेला विरोध करणारे मराठी माणसांचे आणि महाराष्ट्राचे शत्रू आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच सुनेत्रा पवार यांनी याबाबत स्पष्ट भूमिका घ्यावी. शिवसेना अनेक वर्षांपासून मराठीच्या प्रश्नासाठी लढत आहे. महाराष्ट्रात राहणाऱ्या प्रत्येकाला मराठी भाषा आलीच पाहिजे. ज्या राज्यात राहायचे, त्या राज्याची भाषा शिकलीच पाहिजे, हीच बाळासाहेब ठाकरे यांची भूमिका होती. विधान परिषदेच्या निवडणुकीवरही राऊतांनी भाष्य केले. ते म्हणाले की, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मातोश्रीवर उद्धव ठाकरे यांच्याशी आगामी लोकसभा निवडणुका आणि महाविकास आघाडीच्या पुढील रणनीतीवर चर्चा केली. याशिवाय उद्धव ठाकरे यांना आमच्या पक्षातील सर्व नेत्यांसह मविआतील नेत्यांनीही विनंती केली आहे की, तुम्ही विधिमंडळात जाणे आणि मविआचे नेतृत्व करणे गरजेचे आहे. यासाठी आम्ही त्यांचे मन वळवण्याचा प्रयत्न केला. त्यांना त्यांचा निर्णय घेण्याचा अधिकार आहे. राजकीय कार्यकर्त्यांनी इच्छा व्यक्त करणे काहीही चुकीचे नाही.

नवाकाळ
• मुंबई । शनिवार २५ एप्रिल, २०२६ • पान -८



# सचिन ५३ वर्षांचा झाला
**संपत्ती १,६०० कोटी रुपये**

**मुंबई -** मास्टर ब्लास्टर क्रिकेटपटू भारतरत्न सचिन तेंडुलकर आज ५३ वर्षांचा झाला. वाढदिवसानिमित्त त्याने आई, पत्नी अंजली आणि लाडक्या कुत्र्यासोबत फोटो पोस्ट केला आहे. सचिनने २०१३ मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली. मात्र त्यानंतरही त्याच्या कमाईचा ओघ थांबलेला नाही. विविध नामांकित संस्थांच्या जाहिराती, व्यापारी करार, गुंतवणूक आणि इतर उपक्रमांच्या माध्यमातून त्याला दरवर्षी कोट्यवधी रुपयांचे उत्पन्न मिळते. सध्या त्याची एकूण संपत्ती सुमारे १,६०० कोटी रुपयांहून अधिक आहे. मुंबईतील वांद्रे परिसरात त्याचा सुमारे १०० कोटी रुपयांचा आलिशान बंगला आहे.

## 'एनसीईआरटी'च्या इंग्रजी पुस्तकातूनही मराठा साम्राज्याचा नकाशा हटवला

■ सातारा

**नॅशनल** कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च अँड ट्रेनिंगने (एनसीईआरटी) इयत्ता आठवीच्या इतिहासाच्या पुस्तकातून मराठा साम्राज्याचा विस्तार दर्शवणारा नकाशा हटवण्याच्या निर्णय घेतला आहे. यामुळे महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली आहे. हिंदी माध्यमानंतर आता इंग्रजी माध्यमाच्या पुस्तकातूनही हा नकाशा वगळण्यात आल्याचा आरोप होत असून, आज साताऱ्यात शिवप्रेमींचा मोठा मोर्चा काढण्यात आला.

सकाळी दहा वाजता शिवतीर्थ येथून मोर्चाला सुरुवात झाली. घोषणाबाजी करत आंदोलकांनी एनसीईआरटीच्या निर्णयाचा निषेध नोंदवला. मराठ्यांच्या गौरवशाली इतिहासाशी छेडछाड केल्याचा आरोप करत हा नकाशा तत्काळ पुन्हा पुस्तकात घ्यावा, अशी मागणी करण्यात आली. या विषयावर नागपूरच्या भोसले राजघराण्याचे वंशज मुधोजीराजे भोसले यांनी सुरुवातीपासूनच आक्रमक भूमिका घेतली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, इ.स. १७५९ मधील मराठा साम्राज्याचा विस्तार दाखवणारा नकाशा एनसीईआरटीने एकतर्फी हटवला असून, ही कारवाई राजस्थानमधील काही राजपूत घराण्यांच्या दबावाखाली केली आहे.

**साताऱ्यात शिवप्रेमींचा मोर्चा**



## गडकरी कुटुंबाला धमकी नागपुरात गुन्हा दाखल

■ नागपूर

**केंद्रीय** मंत्री नितीन गडकरी आणि त्यांच्या कुटुंबियांना समाजमाध्यमावर व्हिडिओ पोस्ट करून धमकी दिल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. आयुष अग्रवाल नावाच्या व्यक्तीने नागपुरातूनच ही पोस्ट केल्याचे तपासात आढळले.

सुमितकुमार चौहान यांच्या तक्रारीनुसार ते २२ एप्रिल रोजी वैयक्तिक कामानिमित्त नागपुरात आले होते. यशवंत स्टेडियम परिसरात असताना त्यांनी फेसबुकवरील 'सनातनी शेर' या आयडीवर अपलोड केलेला व्हिडिओ पाहिला.

या व्हिडिओमध्ये संबंधित व्यक्तीने नितीन गडकरी आणि त्यांच्या कुटुंबियांविषयी आक्षेपार्ह वक्तव्य करत गंभीर धमकी दिल्याचे दिसले. दुसऱ्या एका व्हिडिओमध्ये धार्मिक भावना भडकवणारे आणि विविध समाजांमध्ये तेढ निर्माण होईल असे वक्तव्य केल्याचे निदर्शनास आले. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## विद्या प्रतिष्ठानमध्ये अघोरी पूजा मिटकरींचा पोस्ट करून दावा

■ मुंबई

**बारामतीतील** पवार कुटुंबाशी संबंधित असलेल्या विद्या प्रतिष्ठान शिक्षण संस्थान परिसरात अघोरी पूजा झाल्याचा दावा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते अमोल मिटकरी यांनी एक्स पोस्टद्वारे केला. या पोस्टमुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघातापूर्वी घडलेल्या घटनांशी याचा संबंध जोडत चर्चांना उधाण आले आहे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

अमोल मिटकरी यांनी एक्सवर फोटो पोस्ट करत लिहिले की, बारामतीमध्ये सहयोग घर, काटेवाडी घर, विद्या प्रतिष्ठान येथे अघोरी पूजा होतात हे बाहेरून येऊन करणाऱ्यांना शक्य नाही. तर अघोरी विद्या मानणारे त्यांच्याशी जोडले जाणारे राजकीय बलाढ्य व्यक्ती व त्यांचे बारामतीला असलेले हस्तक याशिवाय हे होऊ शकत नाही. अशातच या कालावधीत



बारामतीत काही व्हिडिओ प्रसार माध्यमात फिरत आहेत. डिसेंबर २०२५ रोजी विद्या प्रतिष्ठान एआय इमारत बांधकामजवळ ही अघोरी पूजा मध्यरात्री मांडली होती. आदरणीय दादा सकाळी इमारत बांधकाम पाहणी करण्यासाठी येणार होते.

## भोंदू अशोक खरातला सहाव्या गुन्ह्यात ३ दिवसांची कोठडी

■ नाशिक

**भोंदू अशोक** खरात याला आज सहाव्या गुन्ह्यात न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. २६ एप्रिलपर्यंत खरात पोलिसांच्या ताब्यात राहणार असून, या काळात विशेष तपास पथक त्याची सखोल चौकशी करणार आहे.

या सहाव्या गुन्ह्यात खरातवर गंभीर स्वरूपाचे आरोप ठेवण्यात आले आहेत. विधी, पूजा आणि अघोरी उपचारांच्या नावाखाली महिलांची फसवणूक करत त्यांच्यावर अत्याचार केल्याचा आरोप आहे. पाण्यात गुंगीचे औषध मिसळून देणे, खाण्यातूनही औषध देऊन बेशुद्ध करण्याचे प्रकार केल्याची तक्रार पीडितांकडून करण्यात आली आहे. यासोबतच, धार्मिक विधींच्या बहाण्याने मोठ्या प्रमाणात आर्थिक फसवणूक केल्याचाही आरोप तपासात पुढे आला आहे. पीडितांकडून लाखो रुपयांची उकळपट्टी करण्यात आल्याची शक्यता तपास यंत्रणांनी व्यक्त केली आहे.या प्रकरणात एसआयटीने न्यायालयाकडे चार दिवसांच्या पोलीस कोठडीची मागणी केली होती. गुंगीची औषधे कुठून आणली, आर्थिक व्यवहारांची साखळी, इतर संभाव्य पीडितांचा शोध घेण्यासाठी अधिक वेळ आवश्यक असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## बेकायदा बेड्या ठोकल्याबद्दल प्रत्येकी ५० हजारांची भरपाई

**मुंबई उच्च न्यायालयाचे आदेश**

■ मुंबई

**पोलिसांनी** बेड्या ठोकल्यामुळे एका वकील व माजी सैनिकाचा झालेला अपमान गंभीर दखलपात्र असल्याचे मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. या दोन्ही याचिकाकर्त्यांना प्रत्येकी ५० हजार रुपयांची भरपाई देण्याचे आदेश न्यायालयाने राज्य सरकारला दिले आहेत. पोलिसांकडून होणारा अपमान हा फौजदारी न्यायव्यवस्थेवरील विश्वास कमी करणारा असल्याचे ताशेरे न्यायालयाने ओढले आहेत. हा केवळ व्यक्तीचा अपमान नसून तो फौजदारी न्यायव्यवस्थेवरील विश्वास कमी करणारा असल्याचे ताशेरे न्यायालयाने ओढले.

उच्च न्यायालयाच्या नागपूर



खंडपीठातील न्या. उर्मिला जोशी फाळके व न्या. निवेदिता मेहता यांच्या खंडपीठाने हा निकाल दिला. 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' हे महाराष्ट्र पोलिसांचे ब्रीदवाक्य असून, त्याचे पालन करणे आवश्यक आहे, असे खंडपीठाने नमूद केले. वकील योगेश्वर कावडे आणि माजी सैनिक अविनाश दाते या दोघांनाही अमरावती येथील पोलीस ठाण्यातून तहसीलदार कार्यालयात एसटी बसने बेड्या घालून नेण्यात आले. या कृत्यामुळे त्यांच्या प्रतिष्ठेला हानी पोहोचल्याचे न्यायालयाने मान्य केले. हे प्रकरण ऑगस्ट २०१० मधील असून, माजी सैनिक अविनाश दाते यांच्या कारचे नुकसान झाल्याची तक्रार करण्यासाठी हे दोघे अमरावती जिल्ह्यातील तळेगाव पोलीस ठाण्यात गेले होते.



## पवन खेरांचा अटकपूर्व जामीन फेटाळला

■ गुवाहाटी

**आसाममध्ये** दाखल झालेल्या गुन्ह्याप्रकरणी काँग्रेस नेते पवन खेरा यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. गुवाहाटी उच्च न्यायालयाने त्यांचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळल्यामुळे त्यांना धक्का बसला आहे. आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्या पत्नी रिनिकी भुयान यांच्याबद्दल केलेल्या वादग्रस्त आरोपांनंतर गुन्हा दाखल झाला होता.

न्या. पार्थिवज्योती सैकिया यांनी या प्रकरणावरील सुनावणीनंतर निकाल राखून ठेवला होता. आज आदेश देताना न्यायालयाने या प्रकरणाच्या सखोल तपासासाठी पवन खेरा यांची कोठडीतील चौकशी आवश्यक असल्याचे नमूद केले. पवन खेरा यांच्याविरोधात मानहानी, बनावट कागदपत्रे तयार करणे आणि गुन्हेगारी कट रचल्याचे आरोप आहेत. आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्या पत्नी रिनिकी भुयान यांच्याकडे अनेक परदेशी पासपोर्ट आणि परदेशात अघोषित मालमत्ता असल्याचा दावा पवन खेरा यांनी केला होता. त्यानंतर हा गुन्हा दाखल करण्यात झाला. या प्रकरणात आसाम पोलिसांनी ७ एप्रिल रोजी दिल्लीतील निवासस्थानी भेट दिली होती.

## सरकारी भागभांडवल नसल्यास संस्थेवर आरक्षणाची सक्ती नाही

**उच्च न्यायालयाचा दिलासा**

■ मुंबई

**ज्या सहकारी** संस्थांमध्ये सरकारचे कोणतेही भागभांडवल नाही, त्या संस्थांना राज्यातील आरक्षणाचे धोरण लागू करणे सक्तीचे करता येणार नाही. सरकारचा कोणताही 'शासन निर्णय' (जीआर) हा विधिमंडळाने केलेल्या मूळ कायद्यापेक्षा मोठा असू शकत नाही. जर मूळ कायद्यात आरक्षणाची अट नसेल, तर ती जीआरद्वारे सक्तीने लादता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा उच्च न्यायालयाने दिला. जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाच्या (कात्रज डेअरी) याचिकेवर न्या. अजय गडकरी आणि न्या. कमल खाटा यांच्या खंडपीठाने हा निकाल दिला. या निर्णयाने राज्यातील सहकारी संस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे.

राज्य सरकारने १ एप्रिल २००४ रोजी काढलेल्या एका शासन निर्णयाद्वारे याचिकाकर्त्या संघाला ५२ टक्के आरक्षण धोरण राबवण्याची सक्ती केली होती. यासंदर्भात विभागीय उपनिबंधकांनी दिलेले आदेशही आव्हानात्मक होते. कात्रज डेअरी ही पूर्णपणे सभासदांच्या मालकीची असून, त्यात सरकारचे भागभांडवल नाही, असा युक्तिवाद डेअरीच्या वतीने करण्यात आला होता. संघाचा युक्तिवाद खंडपीठाने गांभीर्याने विचारात घेतला आणि सहकारी संस्थांच्या बाजूने निकाल दिला.

एखाद्या संस्थेला सरकारने केवळ सवलतीच्या दरात जमीन दिली किंवा एखादे अनुदान दिले, तर केवळ त्या आधारावर ती संस्था आरक्षणाच्या कक्षेत येत नाही.

## पुण्यात घसरगुंडी कोसळून ४ वर्षीय चिमुरडीचा मृत्यू

■ पुणे

**पुण्याच्या** हडपसरमधील मगरपट्टा परिसरात गृहनिर्माण सोसायटीच्या आवारात खेळत असताना लोखंडी घसरगुंडी कोसळून अनिका नवनाथ देविस्कर या चार वर्षांच्या चिमुरडीचा मृत्यू झाला. या प्रकरणी हडपसर पोलीस ठाणे यांनी सोसायटीचे अध्यक्ष व इतर पदाधिकाऱ्यांविरोधात निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल केला आहे. मगरपट्टा येथील नोबल हॉस्पिटल परिसरातील वेद विहार सोसायटीत ही दुर्घटना घडली. अनिका सोसायटीच्या मैदानात खेळत असताना तेथे बसवण्यात आलेली जड लोखंडी घसरगुंडी अचानक तिच्या अंगावर आणि डोक्यावर कोसळली. त्यानंतर ती गंभीर जखमी होऊन बेशुद्ध पडली. तिला तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. पण उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. या प्रकरणी अनिकाचे वडील नवनाथ देविस्कर यांनी पोलिसांकडे तक्रार दाखल केली आहे.

## पागडी इमारतींची दुरुस्ती करा आदित्य ठाकरे यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

■ मुंबई

**मुंबईतील** उपकरप्राप्त (सेस) जुन्या व धोकादायक इमारतींच्या तातडीच्या दुरुस्तीसाठी विशेष निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्राद्वारे केली आहे.

आदित्य ठाकरे यांनी पत्रात म्हटले की, मुंबईत सुमारे १३,५०० हून अधिक उपकरप्राप्त (सेस) इमारती असून त्यांचा पुनर्विकास न्यायालयीन स्थगितीमुळे ठप्प झाला आहे. परिणामी अनेक इमारती अत्यंत जीर्ण व धोकादायक अवस्थेत पोहोचल्या असून, त्यामध्ये राहणाऱ्या नागरिकांच्या



जीवितास धोका निर्माण झाला आहे.विशेषतः पावसाळा जवळ आल्याने या इमारतींची तातडीने दुरुस्ती करणे अत्यावश्यक आहे. वेळेत उपाययोजना न केल्यास मोठे अपघात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. आदित्य ठाकरे पुढे म्हटले आहे की, सध्या म्हाडाकडून दुरुस्ती कामांसाठी प्रति चौरस मीटर ४,००० रुपये खर्च करण्याची परवानगी आहे. मात्र, सध्याची गंभीर परिस्थिती लक्षात घेता या प्रकरणाकडे विशेष बाब म्हणून पाहून अतिरिक्त निधी उपलब्ध करून द्यावा. मुंबईतील हजारो कुटुंबे या धोकादायक इमारतींमध्ये वास्तव्यास असून त्यांच्या सुरक्षेसाठी सरकारने तातडीने निर्णय घेणे गरजेचे आहे.

नवाकाळ विजय
उद्या वाचा
नेतृत्वाचे नवे युग



'फ्लेक्स फ्युएल'चा पर्याय कशासाठी?




मणिपूर पुन्हा का पेटलंय?



## अमरावतीत सोमवारपासून कृषी विक्रेत्यांचा बेमुदत बंद

■ अमरावती

**खरीप** हंगामाची पूर्वतयारी सुरू असतानाच जिल्ह्यातील कृषी निविष्ठा विक्रेत्यांनी सोमवार २७ एप्रिलपासून बेमुदत बंदचा इशारा दिला आहे. महाराष्ट्र फर्टीलायझर्स, पेस्टीसाईड्स अँड सीड्स डीलर असोसिएशनच्या आवाहनानुसार हा बंद करण्यात येणार आहे. विक्रेत्यांच्या प्रलंबित मागण्या शासनाने अद्याप पूर्ण न केल्याने हा निर्णय घेण्यात आल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे.

कृषी निविष्ठा विक्रेत्यांचा प्रमुख आक्षेप म्हणजे कंपन्यांकडून खतांच्या पुरवठ्यात केले जाणारे 'लिंकिंग'. या पद्धतीत विशिष्ट खत घेण्यासाठी इतर उत्पादने घेण्याची सक्ती केली जाते, ज्यामुळे विक्रेत्यांवर आर्थिक ताण वाढतो आणि व्यवसायावर परिणाम होतो. ही लिंकिंग पद्धत तत्काळ बंद करावी, अशी त्यांची मुख्य मागणी आहे. याशिवाय खत, बियाणे आणि कीटकनाशकांच्या पुरवठ्यात पारदर्शकता आणावी, विक्रेत्यांच्या अडचणी सोडवाव्यात, तसेच धोरणात्मक निर्णय घेताना विक्रेत्यांशी चर्चा करावी, अशा इतर मागण्यांचाही यात समावेश आहे.

## पुण्यात भाजपाकडून काँग्रेसविरोधात आंदोलन

■ पुणे

**महिला** आरक्षण घटनादुरुस्ती विधेयक लोकसभेत नामंजूर झाल्यानंतर राज्यात राजकीय वातावरण तापले आहे. या पार्श्वभूमीवर पुण्यात काँग्रेसविरोधात भाजपाकडून आंदोलन करण्यात आले. महिला आरक्षणाच्या समर्थनार्थ आणि विरोध करणाऱ्या पक्षांचा निषेध करण्यासाठी पुण्यातील बालगंधर्व चौक येथे 'जनआक्रोश मोर्चा' काढण्यात आला होता. यावेळी भारतीय जनता पक्ष महिला आघाडी आक्रमक झाली होती. यावेळी काँग्रेस पक्षाच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या छायाचित्रावर जोडे मारत निषेध व्यक्त करण्यात आला. तसेच महिला आरक्षणाला काँग्रेसने विरोध केल्याचा आरोप करत, आगामी २०२९ च्या निवडणुकांमध्ये त्याचे राजकीय परिणाम भोगावे लागतील, असा इशाराही भाजपा महिला आघाडीकडून देण्यात आला.

## लोकलमध्ये गार्डवर हल्ला रेल्वे कर्मचाऱ्यांचे आंदोलन

■ मुंबई

**ड्युटीवर** असलेल्या ट्रेन गार्डवर उपनगरी लोकलमध्ये एका होमगार्डकडून कथित मारहाण झाल्याच्या घटनेनंतर रेल्वे कर्मचाऱ्यांनी अंधेरी जीआरपी पोलीस ठाण्यात निषेध आंदोलन केले. या घटनेमुळे कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेबाबत गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली. सुमारे २२ ते २३ ट्रेन व्यवस्थापक पोलीस ठाण्यात जमले आणि या प्रकरणात एफआयआर नोंदवण्याची मागणी केली. मात्र, पोलिसांनी केवळ नॉन-कॉग्निजेबल (एनसी) म्हणजे अदखलपात्र गुन्हा नोंदवल्याने कर्मचाऱ्यांमध्ये संताप पसरला. कर्मचाऱ्यांनी आरोप केला की, कर्तव्य बजावण्यात अडथळा आणल्यासारख्या महत्त्वाच्या कलमांचा समावेश करण्यात आलेला नाही. ही घटना २१ एप्रिलच्या रात्री सुमारे ९.३० वाजता चर्चगेट-बोरिवली उपनगरी सेवा ट्रेन क्र. ९०८८९ मध्ये घडली. विलेपार्ले स्थानकात महिलांच्या डब्यात प्रवेश करण्यावरून झालेल्या वादानंतर गार्ड चैतन्य यांना मनोज सावंत नावाच्या होमगार्डने लाथा मारून शिवीगाळ केल्याचा आरोप आहे.

## सीबीएसईच्या दुसऱ्या टप्प्याच्या परीक्षा १५ ते २१ मे दरम्यान

■ मुंबई




**सीबीएसईने** इयत्ता दहावीच्या बोर्ड परीक्षांच्या दुसऱ्या टप्प्याचे वेळापत्रक जाहीर केले असून या परीक्षा १५ मे ते २१ मे दरम्यान घेतल्या जाणार आहेत. या ऐच्छिक परीक्षांमुळे विद्यार्थ्यांना आपले गुण सुधारण्याची किंवा पहिल्या प्रयत्नात नापास झालेल्या विषयांमध्ये उत्तीर्ण होण्याची संधी मिळणार आहे.

जाहीर वेळापत्रकानुसार, १५ मे रोजी गणित स्टँडर्ड आणि बेसिक या विषयाने परीक्षांची सुरुवात होईल. त्यानंतर १६ मे रोजी इंग्रजी कम्युनिकेटिव्ह आणि इंग्रजी लँग्वेज अँड लिटरेचर परीक्षा होणार आहेत. विज्ञान विषयाची परीक्षा १८ मे रोजी होईल.

१९ मे रोजी हिंदी, उर्दू, पंजाबी, बंगाली, तमिळ, तेलुगू, मराठी, गुजराती तसेच काही परदेशी भाषा, गृहशास्त्र आणि निवडक व्यावसायिक व्होकेशनल विषयांच्या परीक्षा घेतल्या जातील. २० मे रोजी संस्कृत, पेंटिंग, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयांच्या परीक्षा होतील, तर अंतिम पेपर सामाजिक शास्त्राचा २१ मे रोजी होणार आहे. हे वेळापत्रक परीक्षा नियंत्रक संयम भारद्वाज यांनी जाहीर केले असून, फेब्रुवारी महिन्यात झालेल्या पहिल्या (अनिवार्य) टप्प्याच्या निकालानंतर एका आठवड्यातच ते प्रसिद्ध करण्यात आले.

**मुंबई उपनगरीय लोकल गाड्यांमध्ये फेरीवाल्यांना अधिकृत परवाने देण्याच्या निर्णयाला उपनगरीय रेल्वे प्रवासी महासंघाने तीव्र विरोध केला आहे. हा निर्णय प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी धोकादायक ठरू शकतो. असा दावा करत मंजूर करण्यात आलेली निविदा तत्काळ रद्द करण्याची मागणी महासंघाने केली.**

## लोकलमध्ये फेरीवाले नकोच प्रवासी महासंघाचा ठाम विरोध

■ बदलापूर

**महासंघाचे** माजी अध्यक्ष आणि मध्य रेल्वे उपनगरीय रेल्वे प्रवासी सल्लागार समितीचे माजी सदस्य मनोहर शेलार यांनी सांगितले की, याबाबतचे निवेदन मध्य रेल्वेच्या मुंबई विभागीय व्यवस्थापक तसेच वरिष्ठ वाणिज्य व्यवस्थापक यांना सादर केले आहे. लोकल गाड्यांमध्ये सुमारे १०० अधिकृत फेरीवाल्यांना व्यवसायासाठी परवाने देण्यात येणार आहेत. त्यासाठी भिवंडीतील एका ठेकेदार कंपनीला सुमारे दीड कोटी रुपयांचा ठेका दिल्याची माहिती आहे. त्यांनी पुढे सांगितले की, मुंबई उपनगरीय लोकल प्रवास आधीच अत्यंत गर्दीचा आणि अल्प कालावधीचा असतो. त्यामुळे प्रवाशांना जास्तीत जास्त



जागा उपलब्ध करून देणे आवश्यक असते. अशा परिस्थितीत फेरीवाल्यांना अधिकृत प्रवेश देणे हे सुरक्षेच्या दृष्टीने धोकादायक ठरू शकते.